केली. त्यामुळे त्यांना अर्थशास्त्रातील नोबेल पारितोषिक हे २००६ मध्ये देण्यात आले. सूक्ष्म वित्तपुरवठा म्हणजे आर्थिकदृष्ट्या असक्षम व क्रियाशील लोकांना ज्यांचे वेगवेगळ्या प्रकारचे उत्पन्न स्त्रोत आहेत अशा लोकांना आर्थिक सेवा पुरविणे. सूक्ष्म वित्तपुरवठा या संकल्पनेत लघु उद्योगांना, कुटीर उद्योगांना प्राथमिक स्तरावर कर्ज पुरवठा व बचत या दोन्ही व्यवस्था केल्या जाव्यात यासाठी वित्त पुरवठा करणे, हे महत्त्वाचे कार्य सूक्ष्म वित्त पुरवठ्याचे आहे. सूक्ष्म वित्तपुरवठा हा बिगर संस्थात्मक स्त्रोत आहे.

**सूक्ष्म वित्तपुरवठा - व्याख्या (Micro Finance : Meaning) :**

"अल्प उत्पन्न गटातील व्यक्ती व संस्था यांना कर्जाऊ स्वरूपात दिलेली रक्कम म्हणजे सूक्ष्म वित्तपुरवठा होय."

सूक्ष्म वित्तामध्ये विनातारण कर्ज, अल्पकालीन कर्ज, अनुत्पादक कर्ज, तातडीचे कर्ज, सुलभ कर्ज, वेळेची बचत करणारे कर्ज, तारण कर्ज या प्रकारचे कर्जाचे व्यवहार करणारी यंत्रणा म्हणजे सूक्ष्म वित्त होय.

**सूक्ष्म वित्त पुरवठ्याचे महत्त्व (Significance of Micro Finance):**

अर्थव्यवस्थेत अशा प्रकारचा एक गट असतो की ज्याला सूक्ष्म वित्त पुरवठ्याची आवश्यकता असते. विशेषतः हा सूक्ष्म वित्त पुरवठा खालील कारणांसाठी केला जातो.

**१) पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या व्यवसायास मदत :**

अल्प विकसित व विकसनशील देशांमध्ये लोक पिढ्यान-पिढ्या चालत आलेले व्यवसाय करतात. अशा परंपरागत व्यवसायात सुधारणा घडवून आणण्यासाठी सूक्ष्म वित्त पुरवठ्याची आवश्यकता असते. या व्यवसायाचा भाग-भांडवलावरती केला जाणारा खर्च कमी असल्याने हे व्यवसाय तात्पुरत्या कर्जाची उभारणी अर्थव्यवस्थेत करतात.

**२) बेकारीत घट :**

सूक्ष्म वित्त पुरवठा केल्यामुळे अल्प उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना आपल्या व्यवसायाची उभारणी करता येते. त्यामुळे लोकांना काही प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होऊन लोकांच्या उत्पन्नात वाढ होते व राहणीमानाचा दर्जा सुधारतो.

**३) विश्वासार्हता निर्माण होते :**

सूक्ष्म वित्ताचा मोठ्या प्रमाणावर पुरवठा हा लघुउद्योग, कुटिरोद्योग यांना केला जातो. त्यामुळे हे उद्योग सर्वसामान्य लोकांनी उभे केलेले असतात. त्यांच्यात प्रामाणिकपणा असतो, सचोटी असते. त्यामुळे ते नियोजित वेळेत कर्जाची परतफेड करतात त्यामुळे कर्जदार व कर्जदाता यांच्यात विश्वासार्हता निर्माण होते.

**४) सक्षमीकरणास मदत :**

भारतासारख्या विकसनशील देशाचा विचार करता महिलांचे सक्षमीकरण करण्यास सूक्ष्म वित्त पुरवठ्याचे स्थान महत्त्वाचे मानले जाते. स्वयंसहायता गट (बचत गटाच्या) माध्यमातून या महिलांना रोजगाराच्या अनेक संधी निर्माण करुन देण्यात आले आहेत. त्यामुळे महिलांचे सक्षमीकरण मोठ्या प्रमाणावर झालले दिसते.

munotes.in

### ५) प्रादेशिक असमतोल दूर करणे :

सूक्ष्म वित्त संस्थांमध्ये समाविष्ट असणारे गट सामूहिक निर्णय व समान हक्कांचा वापर करुन निधीचा समान प्रमाणात वापर केला जातो. विशेषतः हे काम मागासलेल्या भागात केले जाते. त्यामुळे मागासलेल्या भागांचा विकास होऊन मोठ्या प्रमाणावर बचत गटांची संख्या तेथे वाढत आहे. त्यातून रोजगाराच्या संधी निर्माण होऊन प्रादेशिक असमतोल दूर होतो व आर्थिक विषमता कमी होते.

## सूक्ष्म वित्त पुरवठ्याची वैशिष्ट्ये :

### १) कर्ज वापरावर बंधन नाही :

सूक्ष्म वित्तपुरवठा करणाऱ्या वित्तीय संस्था गरीब लोकांना आपल्या मालमत्तेत वाढ करण्याच्या संधी उपलब्ध करुन देतात. या संस्था घरातील आजारपण, पिकांचे नुकसान, चोरी, किंमतीतील बदल इत्यादी धोके सहन करण्याची शक्ती देतात. तसेच गुंतवणूकीच्या अनेक संधी उपलब्ध करुन देतात. त्यामुळे कर्जाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. कुठलीही बंधने लादली जात नाहीत, गुंतवणूक वाढते परिणामी उत्पन्न वाढून राहणीमानाचा दर्जा सुधारतो.

### २) आर्थिक सेवांचा लाभ :

लघुउद्योग असो किंवा कुटिरोद्योग असो यांना सूक्ष्म वित्त पुरवठा हा संस्थाकडून केला जातो. त्यामुळे या उद्योगातील विविध सुधारणा घडवून आणता येतात. अल्प उत्पन्न गटातील लोकांना अनुदान घेण्याची आवड नसते तर ते त्यांच्या व्यवसायातून प्राप्त होणाऱ्या नफ्यातून कर्जाची परतफेड करीत असतात. ग्रामीण भागातील सावकार मोठ्या प्रमाणावर व्याजदर आकारतात तर सूक्ष्म वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था कमी व्याजदर आकारतात. त्या मानाने सूक्ष्म पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या सेवा या सर्व प्रकारच्या शुल्क धरुनही स्वस्त स्वरूपात प्राप्त होतात.

### ३) बचत गोळा करणे :

बचतीला प्रोत्साहन देण्याचे काम सूक्ष्म वित्त पुरवठा संस्था करतात. बचत कशी असावी याचे मार्गदर्शन, बचती गोळा करण्याचे मार्ग, बचतीचा अल्प उत्पन्न गटातील व्यवसाय वाढीसाठी उपयोग करणे अशी मध्यस्थाची भूमिका पार पाडून बचती गोळा करण्याचे काम सूक्ष्म वित्तपुरवठा संस्थांकडून केले जाते.

### ४) स्वयंसहाय्यता गटाची निर्मिती करण्यास मदत :

या सूक्ष्म वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था विशेषतः ग्रामीण भागात महिलांचे व पुरुषांचे स्वयंसहायता गट निर्माण करण्यात यशस्वी झालेले आहेत. या स्वयंसहाय्यता गटांना वित्त पुरवठा करण्याचे काम या संस्थाकडून केले जाते.

### ५) सरकारचा हस्तक्षेप :

या गटाने स्वयंचलित कार्यपद्धतीचा स्वीकार केला आहे. त्यामुळे सरकारने आखलेली धोरणे व नियम यांना बांधील राहून स्वतःचा वित्तपुरवठा व वित्त सहाय्य करीत असते. त्यामुळे सरकारचा या गटात कमीत कमी हस्तक्षेप जाणवतो. समाज प्रबोधन व सामाजिक विकास यावर भर दिला जातो. विशेषतः महिलांना सक्षम करण्यासाठी महत्त्वाची भूमिका सूक्ष्म वित्त पुरवठा संस्था पार पाडत असतात.

## ६.३ सूक्ष्मलक्षी कौटुंबिक जन्मदर सिद्धांत (MICROECONOMICS HOUSEHOLD THEORY OF FERTILITY)

कोणत्याही देशातील लोकसंख्येचा आकार हा त्या अर्थव्यवस्थेसमोरील महत्त्वाचा प्रश्न असतो. या प्रश्नाचा देशातील विविध आर्थिक सामाजिक व राजकीय बाबींची संबंध असतो. परंतु या प्रश्नांचे मूळ कारण सूक्ष्म स्तरावर दडलेले असते. म्हणजेच कौटुंबिक स्तरावर दडलेले आहे. लोकसंख्या संक्रमण सिद्धांताच्या तिसऱ्या अवस्थेत जन्मदर हा मृत्यू दराइतकाच वाढलेला दिसतो. त्याचा परिणाम म्हणून देशाच्या लोकसंख्येचा आकार सारखा दिसतो.

कमी होणाऱ्या जन्मदराचे विश्लेषण करताना नव-सनातनवादी अर्थतज्ज्ञांनी ग्राहकांचे वर्तन हा सिद्धांत विकसित केला आहे. या सिद्धांतानुसार ग्राहक त्यांच्या मर्यादित उत्पन्नातील पैसा खर्च करताना अनेक वस्तूंची खरेदी करताना त्यापासून मिळणारी उपयोगिता अधिकाधिक कशी प्राप्त करता येईल याचा विचार करतात. उपभोक्ता हा विवेकी असतो, त्यामुळे तो महत्तम कल्याणाचा विचार करतो. त्याने केलेला खर्च त्याला महत्तम सीमांत उपयोगिता प्राप्त करुन देत असतो. वस्तूंची प्रचलित किंमत लक्षात ठेवून आणि घटत्या सीमांत उपयोगिता तत्त्वाचा वापर करुन समतोल प्रस्थापित करीत असतो. या समतोल पातळीला वस्तूची किंमत व सीमांत उपयोगिता यांचे गुणोत्तर समान होते. म्हणजेच $\frac{MU_X}{P_X} = \frac{MU_Y}{P_Y}$.

अर्थव्यवस्थेत विवेकी उपभोक्ता अशाप्रकारे आपल्या भांडवलाची गुंतवणूक करतो की, पैशाची सीमांत उपयोगिता ही इतर गुंतवणूकीबरोबर समान राहील. यावरुन असे लक्षात येते की, वस्तू किंवा सेवा यांची किंमत आणि गुंतवणूक किंवा उपभोग आणि मागणी यामध्ये व्यस्त स्वरूपाचा संबंध दिसून येतो.

**आकृती ६.१**

**सूक्ष्मलक्षी जननदर सिद्धांत : विश्लेषण**



वरील आकृतीत, सूक्ष्मलक्षी कौटुंबिक जन्मदर स्पष्ट केलेला आहे. आकृतीत OX अक्षावर जीवित मुलांची संख्या (CD) ने तर OY अक्षावर उपभोग केली जाणारी वस्तू (पालकांद्वारे) (GP) ने दर्शविली आहे. पालक वर्गाला असलेली आपत्यांची अपेक्षा समवृत्ती वक्राच्या सहाय्याने दर्शविली आहे. प्रत्येक समवृत्ती वक्र वस्तुंची संख्या व मुलांच्या संख्येचे वेगवेगळे गट दर्शवितो. या प्रत्येक गटापासून प्राप्त होणारे समाधान समान असते. सर्वात दूरचा म्हणजे उच्च पातळीवर असणारा समवृत्ती वक्र उच्च समाधानाची पातळी दर्शवितो. कुटुंब संस्थेची वस्तूंवर खर्च करण्याची खरेदी शक्ती व आपण त्यांच्या पालनपोषणावर खर्च करण्याची क्षमता किंमत रेषा किंवा बजेट रेषा 'ab' रेषेद्वारे दर्शविली आहे. किंमत रेषेचा उतार जेवढा जास्त तेवढा अपत्यांच्या पालन-पोषणावरचा खर्च हा वस्तूवर होणाऱ्या खर्चापेक्षा जास्त असेल. आकृतीत महत्तम कल्याण प्राप्त "f" बिंदूने दाखविले आहे. त्या बिंदूत OC3 तरी एवढी मुलांकरिता मागणी असून वस्तूंकरिता OG2 एवढा खर्च असेल.

समजा, जर कुटुंबाचे उत्पादन / उत्पन्न वाढले तर किंमत रेषा उजवीकडे सरकेल व a1b1 अशी होईल. अशा किंमत रेषेला समवृत्ती वक्र IC4 हा बिंदु "h" मध्ये स्पर्श करेल. त्या ठिकाणी समतोल प्रस्थापित होईल. म्हणजेच अपत्य असण्याची इच्छा आणि मुलांचा पालन-पोषण खर्च समान होईल. परंतु कुटुंबाचे उत्पन्न वाढल्यामुळे पालक समतोल बिंदू "h" पर्यंत जाण्यापेक्षा तो "g" बिंदूकडे जाईल. तेथे पालक अतिरिक्त अपत्य असण्याऐवजी कमीत कमी अपत्यांवर त्यांच्या चांगल्या शिक्षण व पालन-पोषणावरील खर्च वाढवतील. कुटुंबातील प्रमुख व्यक्ती त्यांच्या मुलांना (अपत्यांना) उपभोग्य वस्तू आणि गुंतवणूक सुद्धा मानतात. आपल्या पाल्याचे संगोपन करताना आई-वडिलांना समाधान मिळते त्यालाच मुलाबाळांचा उपभोग म्हटले जाते. त्याचप्रमाणे गरीब पालकांसाठी त्यांची मुलं विशेषतः मुलगा ही एक प्रकारची गुंतवणूक असते. कारण मुलाला ते आपल्या म्हातारपणातील काठी म्हणून पाहतात आणि त्यांनी म्हातारपणात सांभाळ करावा. अशी त्यांची अपेक्षा असते. अशा प्रकारे सूक्ष्मलक्षी कुटुंब जन्मदर सिद्धांत स्पष्ट करता येतो.

## ६.४ संस्था आणि विकास (INSTITUTIONS AND DEVELOPMENT)

आर्थिक विकास साध्य करायचा असेल तर संस्थांची भूमिका महत्त्वाची मानली जाते. दीर्घावधीमध्ये सर्वसमावेशक वाढ आणि विकासाची हमी देणाऱ्या चांगल्या अंतर्जात संस्थांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. परंतु अशा संस्था कशा स्थापन केल्या जातात हा वादातील प्रश्न आहे. परंतु आर्थिक विकासात संस्थांचे महत्त्व अनन्य साधारण आहे. संस्था ही एक व्यापक संकल्पना असून राजकीय आर्थिक सामाजिक समन्वय घडवून आणणारी मानवी दृष्टिकोनातून निर्बंध म्हणून ही व्यापकपणे स्वीकारलेली परिभाषा आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. तो समाजात रहात असून त्याच्या अनेक गरजा असतात. आणि तो त्या पूर्ण करण्यासाठी सातत्याने धडपडत असतो. संस्था हा काही प्रचलित पण आणि चिरस्थायी विचारांचा मार्ग आहे की, जो एखाद्या गटातील लोकांच्या चालीरीती सवयी यामध्ये अंतर्भूत असतो. थोडक्यात, "संस्था म्हणजे प्रक्रिया, अधिवेशन आणि व्यवस्था यासाठीचा आणखी एक शब्द होय."

या संस्थेच्या व्याख्या वेगवेगळ्या तज्ज्ञांनी आपापल्या पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला आहे.

munotes.in

**१) ई.एस. बोगार्डस यांच्या मते,** "एक सामाजिक संस्था ही समाजाची एक रचना आहे. जी मुख्यतः लोकांच्या गरजा भागविण्यासाठी सुसंस्कृत प्रक्रियेद्वारे आयोजित केली जाते."

**२) सी. एच. कुले यांच्या मते,** "एक संस्था ही सामाजिक वारसा आणि स्थिर गरजा भागविण्यासाठी आवश्यक असणारी सामुदायिक वर्तनाची जटिल एकात्मिक संस्था आहे."

**३) प्रो. एल्वूडच्या मते,** "एखाद्या संस्थेचा अर्थ परस्पर जगण्याच्या विधींचा मार्ग आहे जो समाजाच्या बळाने स्थापित केला जातो, स्वीकारला जातो आणि व्यवस्था करतो."

**संस्थेची वैशिष्ट्ये :**

१. सामाजिक गरजांची पूर्तता करणे या उद्देशाने संस्थांची निर्मिती केली जाते.
२. संस्थांची रचना कायम असते.
३. त्यांचा दृष्टिकोन हा पारंपारिक असतो आणि त्या टिकून रहातात.
४. प्रत्येक संस्था एक युनिट म्हणून कार्य करीत असते.
५. प्रत्येक संस्थेची स्वतंत्र नियमावली व आचारसंहिता असते.

**आर्थिक विकासाच्या वाढीवर संस्थाचा परिणाम (Impact on Economic Development):**

**१) आर्थिक वाढीचा सामान्य दृष्टिकोन :**

संस्थांची कार्यपद्धत, इच्छाशक्ती या आर्थिक विकासासाठी कार्यक्षम असलेल्या लोकांच्या वृत्तीवर आपला प्रभाव पाडतात. लोकांना जोखीम घेण्यास प्रेरित केले नाही, तर ते त्या आर्थिक वाढीस रोखून ठेवतात याचा अर्थ असा होतो की, संस्था या आर्थिक वाढीस प्रोत्साहन देतात किंवा आर्थिक प्रयत्नांना संरक्षण देतात.

आर्थिक वाढीसाठी संस्थांनी प्रयत्न आणि बक्षीस यांच्यात संबंध प्रस्थापित केले पाहिजेत. यासाठी कोणालाही इतरांचे उत्पन्न सामाईक करण्याची परवानगी देऊ नये, खाजगी मालमत्ता, आर्थिक स्वातंत्र्य आणि वारसा कायदा या संस्थेने आर्थिक विकासास चालना देण्यासाठी स्वातंत्र्य दिले पाहिजे.

**२) तांत्रिक ज्ञान :**

अल्पविकसित देशात तंत्रज्ञानाच्या अभावामुळे उपलब्ध असलेली संसाधने पडून आहेत. त्यांच्या कार्यक्षमरीत्या वापर करता येत नाही. कठोर संस्थात्मक यंत्रणा, तांत्रिक बदल स्वीकारण्याच्या मानसिकतेमध्ये त्या नसतात. हे बदल स्वीकारण्यासाठी संस्थात्मक रचनेतील बदल स्वीकारले पाहिजे. तरच सर्वांगीण प्रगती घडवून आणता येईल. देशातील उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करण्यासाठी संशोधनावर विशेष भर देणे ही गरजेचे आहे.

**३) उद्योजकता :**

एखाद्या देशातील उद्योजकतेची वाढ ही संस्थात्मक रचना आणि मूल्य प्रणालीवर अवलंबून असते. उद्योजकतेच्या वाढीसाठी आवश्यक अट म्हणजे उच्च योग्य प्रतिष्ठा मिळवून देणे व योग्य बक्षीस देणे होय. तसेच उद्योजकता वाढीसाठी कमीत कमी निर्बंध व कमीत कमी कर लादले जावेत.

munotes.in

### ४) श्रमिक उत्पादकता :

देशातील सामाजिक संस्थेची स्थापना मोठ्या प्रमाणात श्रमिकांच्या उत्पादकतेवर परिणाम करते. सामाजिक संस्थांमधील संस्थात्मक बदलांमुळे श्रमिकांच्या उत्पन्न क्षमतेवर सकारात्मक बदल घडवून आणता येईल. म्हणून श्रमिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी सामाजिक संस्थांची मदत घेणे हितावह आहे. त्या केवळ मजुरांचा आकार निश्चित करतात असे नाही तर त्याबरोबर उत्पादकतेवर ही परिणाम करतात.

### ५) बचत आणि भांडवल :

एखाद्या देशातील सामाजिक संस्था बचत व भांडवल निर्मिती यावर मोठा प्रभाव पाडत असतात. भांडवल निर्मितीला चालना देण्यासाठी तसेच मालमत्तेच्या अधिकारांचे रक्षण करण्यासाठी योग्य कायदे निर्माण केले पाहिजेत. म्हणजेच खासगी मालमत्तेचे सरकारकडून आणि सरकारी मालमत्तेचा गैरवापर टाळण्यासाठी संस्थांनी कायदेशीर सुरक्षा पुरविली पाहिजे.

## महत्त्वाच्या सामाजिक संस्था आणि आर्थिक वाढ :

### १) खाजगी मालमत्ता :

लोकांची बचत, गुंतवणूक व मेहनत करण्याची इच्छा यावर खाजगी संस्था महत्त्वपूर्ण प्रभाव पाडतात. प्रत्येक व्यक्तीला खाजगी मालमत्ता प्राप्त करणे हा कायदेशीर अधिकार आहे. ती मिळविण्यासाठीचे पूर्ण स्वातंत्र्य असते. लुईस यांच्या मतानुसार जगातील मालमत्ता ही एक मान्यताप्राप्त संस्था आहे. त्याशिवाय मानव जातीने कोणतीही प्रगती केली नसती कारण खासगी मालमत्तेची संस्था लोकांना कठोर परिश्रम करण्यासाठी, संपत्ती मिळविण्यासाठी तसेच बचतीचे गुंतवणूकीमध्ये रुपांतरण करण्यास प्रवृत्त करीत असते.

### २) जातीव्यवस्था :

जातीव्यवस्था ही एक सामाजिक संस्था आहे. जी बहुतेक अल्प विकसित व विकसनशील देशांवर अवलंबून असते. ती आर्थिक वाढीच्या विकासावर अनेक अडथळे निर्माण करत असते. जातीव्यवस्था ही एक कठोर सामाजिक वर्गीकरण आहे. ही समाजातील व्यक्तीच्या इंद्रियांना मर्यादित करते व विकसासाठीच्या योग्य वातावरण निर्मितीत बाधा आणते.

### ३) संयुक्त कुटुंब प्रणाली :

आर्थिक विकासावर परिणाम करणारी आणखी एक सामाजिक संस्था म्हणजे संयुक्त कुटुंब प्रणाली होय. वेगवेगळ्या देशांच्या अभ्यासाअंती असे लक्षात येते की, कुटुंबातील व्यक्तिवादी प्रणाली आर्थिक वाढीस चालना देतात, त्यातून संयुक्त कुटुंब व्यवस्था वृद्धिंगत होते. या कुटुंब प्रणालीमध्ये कुटुंब प्रमुख निर्णय घेत असतो आणि इतर लोक त्याचे अनुकरण करत असतात. या व्यवस्थेत कर्ती व्यक्ती यावर कुटुंबातील अन्य सदस्य अवलंबून असतात. म्हणजेच कमाविता एक आणि खाणारी तोंडे अनेक अशी परिस्थिती असते. त्यामुळे उत्पन्न पूर्ण खर्ची होते परिणामी बचतीचे प्रमाण कमी राहून गुंतवणूक कमी राहते व भांडवल निर्मितीचा दर कमी राहतो.

### ४) वारसा कायदा :

वारसा कायदा ही देशाच्या आर्थिक विकासावर परिणाम करणारी आणखी एक सामाजिक संस्था आहे. वारसा कायद्यामुळे संपत्तीचे अनेक तुकड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर विभाजन केले जाते. त्यामुळे अशा संपत्तीतून निर्माण होणारे उत्पादन कमी राहते तसेच त्या मालमत्तेचे मूल्य कमी होते त्याचा आर्थिक विकासावर वाईट परिणाम होतो.

**५) धर्म :**

काही धर्म आर्थिक वाढीसाठी चालना देतात, तर काही धर्मांमुळे आर्थिक वाढ खुंटते. उदा. जपानमधील धर्म आर्थिक विकासाला उपयुक्त ठरलेला दिसतो, तर भारतामध्ये धर्म हा विकासाच्या मार्गावर मोठा अडथळा ठरला आहे. कारण कर्माच्या शिक्षणाने लोकांना आर्थिक वाढीपासून परावृत्त केले. त्यामुळे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला.

## ६.५ सारांश (CONCLUSION)

या प्रकरणात आपण आर्थिक विकास आणि त्यांच्याशी सबंधित संकल्पनाचा अभ्यास सूक्ष्म पातळीवर करण्यात आला आहे. देशाच्या आर्थिक विकासात या संकल्पनाना अतिशय महत्त्वाचे स्थान आहे.

## ६.६ प्रश्न (QUESTIONS)

१) घरगुती पत बाजाराची संकल्पना स्पष्ट करा.
२) सूक्ष्म वित्तपुरवठ्याची व्याख्या देवून वैशिष्ट्ये स्पष्ट करा.
३) सूक्ष्मलक्षी जननदर आकृतीच्या साहाय्याने स्पष्ट करा.
४) संस्थांचा आर्थिक विकासावरील परिणाम स्पष्ट करा.

## ६.७ संदर्भग्रंथ (REFERENCE)

५. आर्थिक वृद्धी आणि विकास (२०११) प्रा. विठ्ठल सोनावणे व चंद्रमोहन जोशी (शेठ प्रकाशन)
६. वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र (२०११) - प्रा. डॉ. जे. एफ. पाटील (फडके प्रकाशन)
७. भारतीय अर्थव्यवस्था - श्री. निरंजन कोळंबे
८. व्यावसायिक अर्थशास्त्र - एच.एच. अट्रावलकर (शेठ प्रकाशन)
९. Basu Kaushik (1998), Analytical Development Economics, New Delhi.
१०. Ray Debraj (2004), Developmen Economics, New Delhi.
११. www.Google.com

❖❖❖❖

**घटक-४**

# ७

# विकासाचे स्थूल अर्थशास्त्र - I

**घटक रचना :**

७.० उद्दिष्टे
७.१ प्रस्तावना
७.२ आर्थिक विकास आणि पर्यावरण
७.३ नैसर्गिक साधन संपत्ती
७.४ आर्थिक विकासाशी संबंधित पर्यावरणीय समस्या / अडचणी
७.५ पर्यावरण आणि चिरंतन विकास / सातत्यपूर्ण किंवा शाश्वत किंवा निरंतर विकास
७.६ सारांश
७.७ प्रश्न
७.८ संदर्भग्रंथ सूची

## ७.० उद्दिष्टे

१) पर्यावरण आणि आर्थिक विकास यांमधील संबंध अभ्यासणे.
२) विकास आणि नैसर्गिक साधनसंपत्तीशी संबंधित समस्या किंवा अडचणी जाणून घेणे.
३) आर्थिक विकासाशी संबंधित पर्यावरणीय समस्या अभ्यासणे.
४) पर्यावरण आणि चिरंतन विकास यांमधील संबंध अभ्यासणे.

## ७.१ प्रस्तावना (INTRODUCTION)

या प्रकरणात आर्थिक विकासाशी संबंधित आर्थिक बाबींचा अभ्यास करणार आहोत. ज्यामध्ये प्रामुख्याने पर्यावरण आणि आर्थिक विकास, विकास आणि नैसर्गिक साधनसंपत्तीशी संबंधित समस्या व पर्यावरणीय समस्या, पर्यावरण व चिरंतन विकास.

## ७.२ आर्थिक विकास आणि पर्यावरण (ECONOMIC DEVELOPMENT AND ENVIRONMENT)

आर्थिक विकासासाठी पर्यावरण आवश्यक आहे. आपण असे देखील म्हणू शकतो की, पर्यावरण आणि आर्थिक विकास एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी केली जाते. याचा परिणाम आर्थिक उत्पादनाबरोबर मानवी जीवनाच्या अस्तित्वावर होतो. ग्रॉसमन आणि क्रूजर यांच्या मते, आर्थिक विकासाच्या पहिल्या टप्प्यात पर्यावरणाच्या हानीची पातळी वाढते, मात्र या अवस्थेनंतर आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाची गुणवत्ता सुधारते. १९९२ च्या जागतिक विकासाच्या अहवालानुसार औद्योगिक उत्पादन वाढीबरोबर पर्यावरण प्रदूषण व हानी यामध्ये प्रचंड वाढ होत आहे. केवळ पर्यावरणीय कारणांमुळे १० लाखाहून अधिक लोक दरवर्षी आजारी किंवा मृत्यूमुखी पडत आहेत. पाणी टंचाईचा प्रश्न दिवसेंदिवस उग्र स्वरूप धारण करत आहेत. तसेच बरेच नैसर्गिक अधिवास नष्ट होत आहेत. त्यामुळेही अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. उदा. जंगली प्राण्यांची निवास स्थाने नष्ट झाली त्यामुळे ते आज मानवी वस्तीत शिरकाव करु पाहत आहेत, हे आणि यासारखे अनेक प्रश्न असले तरी योग्य धोरण आणि ठोस संस्थात्मक उपाययोजनेमुळे हे टाळता येऊ शकते.

पृथ्वीवरील साधनसामग्री आणि तिची अधिग्रहण श्रमता मर्यादित आहे. मानवी आर्थिक क्रियांवरील मर्यादा, पर्यायी तंत्रज्ञान, तांत्रिक प्रगती आणि मुलभूत बदल इत्यादींवर अवलंबून आहे. जागतिक बँकेनुसार नैसर्गिक साधनसामग्री जसे पाणी, जंगल, स्वच्छ हवा यावर जगातील विविध देशांकडून कब्जा केला जात आहे. मात्र धातू, खनिजे, ऊर्जा यासारख्या साधनांवर ही शक्यता कमी आहे. कारण पाणी, जंगले, स्वच्छ हवा इ. यांच्यावर अवलंबित वस्तू बाजार किंमतीत प्रतिबिंबित होत आहे. त्यामुळे त्याला पर्यायी साधने, तांत्रिक प्रगती याबाबतीत मजबुती मिळते आहे. म्हणजेच पहिल्या गटातील वस्तूंना संधी उपलब्ध असल्याने त्याचा वापर काटकसरीने करण्याला प्रोत्साहन दिले जात नाही. त्यामुळे या संसाधनांचा योग्य आणि काटकसरीने वापर करण्यासाठी योग्य धोरणे संस्थात्मक पातळीवर राबविली पाहिजेत. उदा. शेतकरी, व्यापारी संस्था, सर्वसामान्य लोक इ. ज्यामुळे त्या संसाधनांचे महत्त्व आणि मूल्य लक्षात येईल. जागतिक बँकेनुसार पर्यावरणीय धोरणांना लोकांकडून पाठिंबा मिळतो. त्यावेळी पर्यायी तंत्रज्ञान, तांत्रिक प्रगती आणि मुलभूत बदल शक्तिशाली ठरतात. अशाप्रकारे पर्यावरणीय वाद योग्यप्रकारे सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातात आणि बाजार व्यवस्था व धोरणांच्या अपयशावर मात करण्यास योग्य धोरणे आखली जातात.

### ७.१.१ वाढत्या आर्थिक क्रियांचा पर्यावरणावरील परिणाम (Impact of Increasing Economic Activities on Environment) :

वाढत्या आर्थिक क्रियांमुळे पर्यावरणासंबंधित अनेक प्रश्न / समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात. अशा प्रकारच्या समस्या सोडविण्यासाठी योग्य धोरणे आणि संस्था त्यासंदर्भात कशाप्रकारे मदत करते हे पुढीलप्रमाणे -

#### १) पर्यावरण संदर्भातील काही प्रश्न कमी होतात :

ज्यावेळी उत्पन्न वाढते त्यावेळी शुद्ध पाणी, वीजपुरवठा यापासून वंचित असलेल्या लोकसंख्येचे प्रमाण कमी होते, कारण जसे उत्पन्न वाढते त्याच प्रमाणात सार्वजनिक सेवा

पुरवण्याचे स्त्रोत देखील निर्माण होतात. जेव्हा लोकांना त्यांच्या दैनंदिन जीवनाविषयी चिंता नसते. तेव्हा ते आपल्या संपत्तीचे वाटप संशोधनात्मक कामासाठी, नफ्यात गुंतवणूक करणाऱ्या कार्यासाठी करतात. हा आर्थिक विकास आणि पर्यावरणाची गुणवत्ता यातील सकारात्मक संबंध दुर्लक्षित करुन चालणार नाही.

### २) उत्पन्न वाढीच्या पहिल्या टप्प्यात प्रश्न कठीण होतात, परंतु नंतर परिस्थितीत सुधारणा होते :

पहिल्या टप्प्यात जल प्रदूषण, वायू प्रदूषण, हवा प्रदूषण, नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास, जंगल तोड, नैसर्गिक अधिवासावरील अतिक्रमण इत्यादी सारख्या अडचणी निर्माण होतात. या अडचणी सोडविण्यासाठी एखाद्या देशाकडून जाणीवपूर्वक धोरणे राबविली जातात तेव्हा तो, जास्तीत जास्त संसाधने उपलब्ध करुन देऊन या समस्यांची तीव्रता कमी करण्याचा प्रयत्न करतो.

### ३) उत्पन्न वाढ आणि पर्यावरणीय प्रश्न प्रखर बनतात :

नायट्रोजन, कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन हे शहरी भागातील कचरा या प्रकारात मोडतात. देशातील व्यक्ती, व्यापारी संस्था यांना कचरा व त्याचे उत्सर्जन यात कपात करण्यासाठी प्रोत्साहनपर बक्षीस दिले जात नाही. दंड किंवा इतर प्रकारची शिक्षा केली जात नाही तोपर्यंत याचे प्रमाण कमी होत नाही.

### ४) पर्यावरणाबाबत कुझनेट वक्र :

पर्यावरणाशी ज्या संबंधित काही समस्या असतात. उदा. उपनगरातील सांडपाणी, व्यवस्थापन समस्या उत्पन्न वाढीबरोबरच सुधारु शकतात. तसेच वायू प्रदूषण, जल प्रदूषण उत्पन्न वाढीबरोबर सुरुवातीला दिसून येते पण नंतर त्यातही सुधारणा होते. तसेच उत्पन्न वाढीबरोबर कार्बन डायऑक्साईडचे ($CO_2$)उत्सर्जनाचे प्रमाण मात्र वाढतच जाते. अशा बऱ्याचशा पर्यावरणाच्या समस्या या 'U' स्वरूपाचे रूप धारण करतात व यातून उत्पन्न वाढ घडून येते. यालाच कुझनेट वक्र किंवा कुझनेटचा पर्यावरणीय वक्र असे म्हटले जाते.

### ५) उत्पन्न वाढ आणि पर्यावरणीय समस्या यातील संबंध कमी करता येतो :

जागतिक बँकेने उत्पन्न पातळी व पर्यावरणीय समस्या यातील टाळता न येणाऱ्या बाबी स्पष्ट केलेल्या नाहीत. काही देश अशा प्रकारची धोरणे निश्चित करतात की, ज्याद्वारे या समस्या तशाच उत्पन्न पातळीच्या इतर देशांपेक्षा कमी करता येतात. सध्या तंत्रज्ञानामुळे पुष्कळ देशांना कमीत कमी पर्यावरण हानी पोहचवुन आपली आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. ती पूर्वी साध्य करणे शक्य नव्हती.

## ७.३ नैसर्गिक साधन संपत्ती (NATURAL RESOURCES)

पृथ्वीवर असलेल्या सजीवांपैकी मानव हा पृथ्वीवरील सर्वात बुद्धीमान प्राणी आहे. मानवाने आपल्याकडे असणारी हुशारी, कौशल्य, बुद्धिमत्ता, ऊर्जा यांच्या जोरावर नैसर्गिक साधनसंपत्तीचा पुरेपुर वापर करुन घेतला आहे. मानवी जीवन समृद्ध आणि सुखकर करण्यासाठी तो सातत्याने प्रयत्नशील आहे. नैसर्गिक घटकांचा अमर्यादित वापर करुन तो आपल्या अन्न, वस्त्र, निवारा व इतर गरजा पूर्ण करतो. या घटकांमध्ये हवा, पाणी, जमीन, नदी-

नाले, दगड, खनिजे, वनस्पती, प्राणी, पक्षी एवढेच नव्हे तर पर्यावरणातील सर्व मूर्त-अमूर्त घटकांचा वापर करुन मानव आपले जीवन जगतो आहे. या घटकांना नैसर्गिक साधनसंपत्ती असे म्हणतात.

आदिमानवापासून ते सुधारित आधुनिक मानवापर्यंत सर्वच काळातील मानव हा आपले जीवन जगण्यासाठी पर्यावरणातील साधनसंपत्तीवर अवलंबून आहे. आधुनिक मानव आदिमानवापेक्षा अधिक सुखसोयींनी युक्त जीवन जगत असला तरी त्याचे जीवन आदिमानवा इतकेच निसर्गावर अवलंबुन आहे. मानवी जीवन आणि विकासाच्या दृष्टिकोनातुन पाहिले तर साधन संपत्तीचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. त्यासाठी साधनसंपत्तीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**साधन संपत्ती संकल्पना (Resources Concept) :**

मानव आपल्या गरजा पूर्ततेसाठी निसर्गातील ज्या घटकांचा वापर करतो. त्यांना साधनसंपत्ती म्हणतात. साधनसंपत्ती ही दृश्य-अदृश्य, मूर्त-अमूर्त स्वरूपाची असते. त्यामुळे मानवी गरजांची पूर्तता होते. म्हणून मानवी जीवन व मानवाचे अस्तित्व त्यांना उपयुक्त असणारे घटक म्हणजे साधनसंपत्ती होय.

**व्याख्या :**

झिमर मँन यांच्या मते, विशिष्ट उद्दिष्ट किंवा गरजा यांची पूर्तता करण्याचे साधन म्हणजे साधनसंपत्ती होय.

जॉकी स्मिथ यांच्या मते, मानवाला कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारे उपयोगी पडणारे पर्यावरणीय घटक म्हणजे साधनसंपत्ती होय.

गिन्सबर्ग यांच्या मते, मानवी क्रिया यांच्या क्षेत्रात निसर्गाने मुक्तपणे प्रदान केलेले भौतिक घटक म्हणजे साधनसंपत्ती होय.

**साधनसंपत्तीचे वर्गीकरण :**

नैसर्गिक घटकांचा मानव वापर करतो. हवा, पाणी, जमीन, जंगले, प्राणी-पक्षी, नद्या-नाले, सरोवरे, खनिजे इत्यादी या साधनसंपत्तीचे भिन्न पद्धतीने वर्गीकरण करण्यात येते, याबाबत सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे -

**अ) वनसंपदा (Forest Resources) :**

जगात दिवसेंदिवस वनांचे प्रमाण कमी होत आहे. दरवर्षी जवळपास ९० लाख हेक्टर पेक्षा अधिक जंगलतोड केली जाते. यामागचे प्रमुख कारण म्हणजे वनातील मानवी हस्तक्षेप होय. वनांचे प्रमाण कमी झाल्याने पर्यावरणीय समस्या मोठ्या प्रमाणात निर्माण होताना दिसून येतात. वनांचे प्रमाण कमी होण्यास कारणीभूत असणारी कारणे किंवा समस्या पुढीलप्रमाणे -

**वनसंपत्ती संबंधित समस्या (Environmental Problem Associated with Forest Resources) :**

**१) लाकडाचा अतिरिक्त वापर :**

मानव मोठ्या प्रमाणात कोणत्या ना कोणत्या कारणावरुन लाकडाचा वापर करताना दिसून येतो. इंधनासाठी, शोभिवंत वस्तू बनवणे, पेट्या तयार करणे, फर्निचर, दारे-खिडक्या, छप्पर एवढेच नव्हे तर मानवी मृत्यूनंतर देखील त्याला जाळण्यासाठी लाकडाचा वापर केला जातो. सिमेंट कॉंक्रिंटचे बांधकाम करीत असताना देखील लाकडी फळ्या व दांड्यांच्या वापर करतात. या सर्व कारणांमुळे मर्यादित लाकडांचा अवास्तव वापर यामुळे वने धोक्यात आलेली आहेत.

**२) लाकूड कटाई :**

लाकूड कटाईमुळे मोठ्या प्रमाणात जंगले नष्ट होताना दिसतात. त्याचे विपरीत परिणाम जंगलातील पशुपक्ष्यांवर होतात. लाकडापासून कागद निर्मिती, प्लायवुड, जहाज बांधणी, विविध उद्योगात लाकडाचा वाढता वापर इत्यादी कारणांमुळे मोठ्या प्रमाणात लाकूड कटाई केली जाते. एकूण उत्पादनाच्या ७०% उत्पन्न लाकूड तोडीपासून मिळते. लाकूड विकून लोकांना आर्थिक उत्पन्न प्राप्त होते. लाकूड कटाईमुळे साग, शिसव, चंदन सारखी दुर्मिळ आणि अत्यावश्यक असणारे वृक्ष देखील आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. लाकूड कटाई हा लोकांचा व्यवसाय होऊन त्यामुळे जंगले उद्धवस्त झाली आहेत. यामुळे पर्यावरणाचा समतोल वाढला आहे.

**३) खाणकामाचा वनांवर परिणाम :**

खाणकाम प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. मात्र आधुनिक काळात मोठ्या प्रमाणात आणि शास्त्रशुद्ध पद्धतीने यंत्रांच्या साहाय्याने खाणकाम केले जाते. जमिनीखालील खनिजे काढण्यासाठी भूपृष्ठावरील वृक्षांची तोड मोठ्या प्रमाणात करुन खनिजे बाहेर काढली जातात. मात्र बाहेर पडणारे टाकाऊ पदार्थ व माती इतरत्र टाकली जाते. धुळीमुळे वातावरणात प्रदूषण निर्माण होते. बांधकामासाठी चिरा मागणी मोठी असल्याने चिरा खाणीची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यासाठी कातळ भाग पोखरला जात आहेत. यामुळे वने नष्ट होत आहेत.

**४) धरण निर्मितीचे पर्यावरणातील परिणाम :**

धरणातील पाण्याचा वापर जलसिंचन, पिण्यासाठी, जलविद्युत निर्मिती, उद्योगधंदे यासाठी करण्यात येतो. धरणे बांधताना हजारो हेक्टर क्षेत्र पाण्याखाली जाते. येथे असणारी वनस्पती देखील धरणाच्या पाण्यात बुडून नष्ट होते. जंग क्षेत्र पाण्याखाली गेल्याने वनांचे क्षेत्र कमी होते. कालवे काढल्याने देखील वृक्षतोड मोठ्या प्रमाणात होते. धरणे बांधल्याने लोकांना स्थलांतर करावे लागते. उदा. नर्मदा सरोवर धरणाचा परिणाम प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या मानव आणि पर्यावरणावती झालेला स्पष्ट दिसून येतो.

**५) विकास प्रकल्प व वनांचा नाश :**

विकासाच्या नावाखाली प्रचंड प्रमाणात वनांचा नाश होतो. विकास साधण्यासाठी रस्ते मार्ग, लोहमार्ग, उद्योगधंद्यांची निर्मिती, विविध प्रकारचे प्रकल्प उभारले जातात. त्यामुळे लाखो

झाडे तोडली जातात. उदा. मुंबई-गोवा महामार्ग तयार केल्यामुळे लाखो झाडांची कत्तल करावी लागली. तसेच मुंबई-आग्रा महामार्ग व इतर रस्त्यांच्या रुंदीकरणामुळे जुनी असलेली झाडे तोडण्यात आली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ निर्मितीच्या वेळी खारफुटीच्या वनांचा नाश केला जाणार आहे.

### ब) जलसंपदा (Water Resources) :

सूर्यमालेत जलाचे अस्तित्व फक्त पृथ्वी या ग्रहावर आहे. पृथ्वीचा ७१% भाग पाण्याने व्यापलेला असून त्यापैकी २% भाग गोड पाण्याचा आहे. ९८% भाग क्षारयुक्त पाण्याने व्यापलेला आहे. ज्याप्रमाणे मानवाला जीवन जगण्यासाठी प्राणवायूची गरज आहे. त्याचप्रमाणे पाण्याची देखील गरज आहे. सजीवांच्या अस्तित्वासाठी पाणी महत्त्वाचे आहे. पाण्याचा वापर मानव फक्त वैयक्तिक जीवनासाठी करतो असे नाही, तर व्यावसायिक दृष्ट्या देखील करतो. उदा. जलवाहतूक, जलसिंचन, पशुपालन, उद्योगधंदे इत्यादी. ६०% ते ७०% पाणी मानवी शरीरात असते. अलीकडच्या काळात पाण्याचा मोठा वापर व मानवी हव्यासाच्या पोटी जल प्रदूषणाची समस्या आणि जल तुटवडा ही समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. एवढेच नव्हे तर असे देखील म्हटले जाते की तिसरे महायुद्ध हे केवळ पाण्यासाठी होईल.

### जलसंपदा संबंधित पर्यावरणीय समस्या (Environmental Problem Associated with Water Resources) :

मानव विभिन्न कारणांमुळे पाण्याचा सतत आणि मोठ्या प्रमाणात वापर करताना दिसून येतो. या अतिरिक्त वापरामुळे पर्यावरणीय बदलांमुळे पाण्याबाबत विविध समस्या निर्माण झाल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे -

### १) पाण्याचा अतिवापर :

पाण्याचा मोठ्या प्रमाणात वापर शेती, उद्योगधंदे, घरगुती कामात, विद्युत निर्मिती इत्यादी कारणांसाठी होतो. नद्या-नाले, सरोवरे हे भूपृष्ठावरील आणि विहिरी, कूपनलिका भूगर्भातील पाण्याचे साठे असून यांचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. पाण्याच्या वाढत्या वापरामुळे शुद्ध व पिण्यायोग्य पाण्याची कमतरता भासू लागली आहे. पाण्याचे प्रदूषण वाढते आहे. शेतात पाण्याचा अतिरिक्त वापर केल्याने दलदल, पाणथळ, मृदेची निर्मिती आणि क्षारयुक्त जमिनीची निर्मिती तसेच जमिनीची सुपीकता कमी होते. उत्पादन कमी होणे इत्यादी सारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

### २) पूर :

पर्यावरणीय आपत्तीपैकी पाण्यामुळे निर्माण होणारी पूर ही विनाशकारी आपत्ती आहे. अतिवृष्टीमुळे नदी-नाल्यातील पाणी वाढून आसपासच्या परिसरात पसरुन जीवित हानी, वित्त हानी घडून येते, यासारखी स्थिती म्हणजे पूर होय. नद्याची नागमोडी वळणे, धरण फुटी, त्सुनामी लाटा, नदी पात्रात गाळाचे संचयन यामुळे नद्यांना पूर येतो. उदा. उत्तर अमेरिकेतील संयुक्त संस्थानातील मिसिसिपी, टेनिस, मिसुरी या नद्यांच्या खोऱ्यात आवर्तामुळे भयंकर वृष्टी होऊन नद्यांना पुर येतात. भारतात गंगा, ब्रह्मपुत्रा, गोदावरी, नर्मदा, कावेरी, कृष्णा नद्यांना तसेच कोकण भागात काही नद्यांना अतिवृष्टीमुळे पूर येतात, या सर्वांचा परिणाम म्हणून जीवितहानी व वित्तहानी, घरांचे नुकसान, वाहतूक मार्गांची हानी, साथीचे रोग, जलप्रदूषण, पायाभूत सुविधांचा विनाश इत्यादी समस्या निर्माण होतात.

### ३) अवर्षण :

पाण्याच्या कमतरतेमुळे अवर्षण व दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. अवर्षणाची ही संकल्पना विभिन्न प्रदेशात विविध अर्थाने वापरली जाते. अवर्षणामुळे हवामान, भूमी, शेती पद्धती, आर्थिक व्यवसाय यावर परिणाम होतो. अवर्षण ही सापेक्ष संज्ञा असून एखाद्या प्रदेशातील अवर्षण परिस्थिती दुसऱ्या प्रदेशात सामान्य किंवा अनुकूल परिस्थिती ठरु शकते. त्यामुळे अवर्षणाचे मूल्यनिर्धारण पावसाच्या प्रमाणानुसार करण्याऐवजी जर असंतुलन यानुसार करणे योग्य ठरते.

### ४) जलविवाद किंवा पाण्यासंबंधी वाद :

पाणी मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. मात्र याचा तुटवड्यामुळे आज देशा-देशात, राज्या-राज्यात, माणसा-माणसांत पाण्यावरुन वाद चालू आहेत. भारतातून पाकिस्तानात ज्या नद्या वाहतात या संदर्भात वाद आहे. कावेरी नदीच्या पाण्यावरुन तामिळनाडू व कर्नाटक राज्यात वाद सुरु आहे. नोव्हेंबर २००२ मध्ये गोदावरी नदीचे पाणी औरंगाबाद, बीड जिल्ह्यात देण्यावरुन वाद आहेत. यावरुन महाराष्ट्रात राजकारण तापलेले दिसते. राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, ओरिसा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र या राज्यात पाण्याची कमतरता असल्याने मोठ्या प्रमाणात जलविवाद सुरु आहेत.

### ५) धरण विषयक समस्या :

पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी नद्यांवर धरणे बांधली जातात. काही नद्यांवर ३ ते ४ धरणे बांधली जातात. धरणातील पाणी वापराबाबत समस्या निर्माण होते. उदा. महाराष्ट्र - गुजरात नर्मदा नदीवर सरदार सरोवर बांधलेले असून त्याचे जास्त पाणी गुजरात राज्याला वापरायला मिळते. धरणाचा फायदा हा मत्स्य व्यवसाय, औद्योगिकीकरण, पिण्यायोग्य पाणी, सिंचन क्षेत्र, जलविद्युतनिर्मिती, पूर नियंत्रण इत्यादीसाठी होत असला तरी धरणनिर्मितीमुळे गावाचे पुनर्वसन, शेतीयोग्य जमिनीचे प्रमाण कमी, वनांचा नाश, परिसंस्थेत बिघाड, भूकंपाची शक्यता, धरण फूटीची समस्या अशा अनेक समस्या निर्माण होताना दिसतात.

### क) प्राणी संपदा (Animal Resources) :

पर्यावरणात अनेक अन्नसाखळ्या कार्यरत आहेत. यात वनस्पती बरोबर प्राणीही महत्त्वाचे आहेत. प्राचीन काळापासून मानव व प्राणी यांच्यात जवळचा संबंध आहे. मानवाने काही प्राण्यांचा वापर आपल्या वैयक्तिक जीवनात केला आहे. आधुनिक युगात प्राण्यांचा वापर केवळ वाहतुकीसाठी मर्यादित न रहाता अर्थव्यवस्थेचा एक भाग बनला आहे. मात्र आजही वाळवंटात वाहतूकीसाठी उंटाचा वापर केला जातो. घनदाट जंगलात वाहतुकीसाठी हत्तीचा वापर केला जातो.

### प्राणी संपदा संबंधित समस्या (Environmental Problem Associated with Animal Resources) :

### १) प्राण्यांचा अतिरिक्त वापर :

मानव पूर्वीपासूनच प्राण्यांचा वापर करुन जीवन जगत आला आहे. पशूपालनातून दुग्ध उत्पादन, वाहतूक, शेतकाम यासाठी मानव प्राण्यांचा वापर करीत आला. परंतु अलीकडच्या काळात मानवाचा प्राण्यांकडे पाहण्याचा दृष्टीकोन केवळ वाहतुकी पुरता मर्यादित न राहता त्याची जागा व्यवसायाने घेतली. शेळ्या, मेंढ्या, बोकड तसेच इतर प्राण्यांपासून मांस उपलब्ध होते.

यामुळे या प्राण्यांची संख्या कमी होत चालली आहे. कारण प्राण्यांची हत्या मानवाकडून मोठ्या प्रमाणात केली जात आहे.

**२) प्राण्यांची शिकार :**

आदिमानव प्राण्यांची शिकार केवळ खाद्य म्हणून करत होता, मात्र आधुनिक काळात प्राण्यांची शिकार केवळ मांस खाणे तेवढ्यापुरती मर्यादित न राहता प्राण्यांचा प्रत्येक अवयवांची विक्री करण्यासाठी किंवा त्यातून उत्पादन उपलब्ध करण्यासाठी केली जाते. उदा. कातडी, मांस, शिंगे, पिसे, कस्तुरी, हस्तिदंत इत्यादी काळीवेळा तर केवळ मनोरंजनासाठी शिकार केली जाते. यामुळे हरीण, वाघ, कस्तुरीमृग, सांबर यासारखे प्राणी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. वन्यजीवांचा अवैध व्यापार मोठ्या प्रमाणात वाढत आहे. मोठ्या प्रमाणात वाघाची तस्करी केली जाते. त्यामुळे भारतात वाघांची संख्या अत्यंत कमी आहे. विशेषतः तस्करी केलेल्या वस्तूची चीन, ऑस्ट्रेलिया, जपान इत्यादी देशांमध्ये निर्यात केली जाते. वाघाच्या लिंगापासून सेक्सवर्धक औषधे चीनमध्ये बनविली जातात. जपान, तैवान, हाँगकाँगमध्ये साप व मांजरांची प्रचंड मागणी आहे. या व्यापारामुळे वन्यजीवांचा फार मोठ्या प्रमाणात शिकार होत आहे.

**३) जंगलतोड व निवासस्थानाची हानी :**

पर्यावरणात अनेक घटक असून ते एकमेकांत गुंतलेले आहेत. पर्यावरणाचा अविभाज्य भाग म्हणजे जंगल, वृक्ष होय. हिंदू संस्कृतीत वृक्षाला दैवत मानले जाते. जंगल प्राण्यांचे निवासस्थान असून अलीकडे मानवाने विकासाच्या नावाखाली आपला स्वार्थ साधण्यासाठी लोभी प्रवृत्तींमुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणात केली आहे. लोकसंख्या दिवसेंदिस वाढत आहे. याशिवाय शेती विस्तार, रस्ते, लोहमार्ग, धरणांचे बांधकाम, नागरिकीकरण, उद्योगधंद्यांची वाढ व इंधन म्हणून लाकडाचा वापर इत्यादी अनेक कारणांमुळे निर्वणीकरण मोठ्या प्रमाणात होत आहे. यामुळे प्राण्यांची निवासस्थान मोठ्या प्रमाणात नष्ट होत आहेत.

**४) देवदेवतांसाठी प्राण्यांचा बळी :**

देवदेवतांना प्रसन्न करण्यासाठी आदिमानवापासून आजच्या आधुनिक मानवापर्यंत कोणत्या ना कोणत्या कारणांसाठी प्राण्यांचा बळी देत आला आहे. मरी आईस - रेडा, विरोबा मसोबास - कोंबडा या पद्धतीने दरवर्षी यात्रेत लाखो प्राण्यांचा बळी दिला जातो. या अनिष्ठ प्रथांमुळे प्राण्यांचा बळी जात आहे.

**५) प्राण्यांची झुंज व प्रतिष्ठा :**

प्राण्यांची झुंज लावण्याचा प्रकार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. यामध्येकोंबड्यांची, बैलांची, बोकडांची झुंज लावली जाते आणि यात प्रतिष्ठा मानली जाते.

**ड) खनिज संपदा (Mineral Resources) :**

कोणत्याही देशाच्या विकासासाठी खनिजसंपत्ती महत्त्वाची आहेत. त्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्ती, खनिजसंपत्ती, यांना अनन्य साधारण महत्त्व आहे. पृथ्वीवरील खडक बहुतांश खनिजांनी बनलेले आहेत. निसर्गातील घन, विशिष्ट रासायनिक संघटन असलेल्या आंतरिक संरचना, स्फटिके असलेल्या पदार्थांना खनिजे म्हणतात. खाणकाम व्यवसाय येथील खनिजे प्राप्त होतात. या खाणकामातून विविध पदार्थ भूतलावर टाकले जातात. त्यामुळे परिसंस्था व

पर्यावरणाचे सौंदर्य नष्ट होते. म्हणून खनिज संपत्तीचा अभ्यास पर्यावरणाच्या दृष्टीने करणे महत्त्वाचे ठरते.

**खनिज संपत्तीचे वर्गीकरण :**

**१) अधातू खनिजे :**

जी खनिजे तापविल्याने प्रसरण पावत नाहीत, त्यांना अधातू असे म्हणतात. उदा. गंधक, खडक, जिप्सम, ग्रॅफाईट, हिरा इत्यादी.

**२) धातू खनिजे :**

जी खनिजे तापविल्यानंतर प्रसरण पावतात, त्यांना धातू खनिजे असे म्हणतात. उदा. सोने, चांदी, बॉक्साईट, मॅंगनीज, प्लेटिनम, टंगस्टन इत्यादी.

**३) शक्ती साधने :**

ज्या खनिजांपासून उष्णता किंवा शक्ती मिळते त्यांना शक्तीसाधने असे म्हणतात. उदा. दगडी कोळसा, खनिजतेल, नैसर्गिक वायू, वारा, सौरशक्ती, सागरी लाटा इत्यादी.

**खनिज संपदेचे महत्त्व :**

देशाच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका खनिजसंपत्ती बजावते. यावर देशाचा विकास अवलंबून असतो. जेथे खनिजांची उपलब्धता जास्त तेथे औद्योगिक विकास मोठ्या प्रमाणात वाढतो. खनिजांचा वापर करुन वेगवेगळ्या वस्तूंची निर्मिती केली जाते. जगातील प्रमुख खनिजे ॲल्युमिनियम, तांबे, दगडी कोळसा, कथिल, अभ्रक इत्यादी.

**खनिज संपत्ती संबंधित समस्या (Environmental Problem Associated with Mineral Resources) :**

**१) खनिजांचा अतिवापर :**

भू-गर्भात सापडणारी खनिजे प्रामुख्याने विविध प्रकारच्या यंत्रसामग्री निर्मिती, औषध व रसायन निर्मिती, विद्युत उपकरणांमध्ये वापरली जातात. सध्या खनिजांचा वापर वाढला आहे. भुगर्भातील खनिजांचा साठा मर्यादित असून त्यांच्या अमर्यादित वापरामुळे तो संपुष्टात आला आहे. याचा भावी विकासावर विपरीत परिणाम होणार आहे.

**२) खाणकामामुळे भूमीचा ऱ्हास :**

खाणकामामुळे टाकाऊ पदार्थ व इतर घटक सभोवतालच्या परिसरात पसरतात. जमिनीवर मोठ्या प्रमाणात मोठे खड्डे पडतात. यात पाणी व इतर कचरा साचून भूमी निरुपयोगी बनते. खाणकामामुळे शेतजमीन निकृष्ट बनते. खाणकामामुळे भूमीचे दबणे, खचणे तसेच भूमीची झीज यासारखे प्रकार होतात.

**३) प्रदूषण :**

जलप्रदूषण, हवाप्रदूषण, भूमीप्रदूषण खाणकामामुळे घडून येते. जमिनीमध्ये असलेल्या पाण्यात ॲसिडचे प्रमाण असल्याने हे पाणी सभोवतालच्या ओढ्यात, नदीमध्ये वाहून गेल्यामुळे जलप्रदूषण होते. खाणकामाच्या वेळी धूर हवेत मिसळतो. क्रोमियम, शिसे, यांची विषारी धूर वातावरणात मिसळून हवा प्रदूषण होते. खडक फोडण्यासाठी सुरुंग लावल्याने ध्वनी प्रदूषण होते.

munotes.in

### ४) निर्वणीकरण :

जंगलयुक्त भागात खनिजांचे साठे असतील तर तेथे खाणकामासाठी झाडे तोडली जातात. तसेच मजुरांना राहण्यासाठी जागा, खनिज शुद्धीकरण, कारखान्याची स्थापना, रस्ते निर्मिती, टाकाऊ पदार्थ ठेवण्यासाठी जागेची गरज असते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात झाडे तोडली जातात व निर्वणीकरण घडून येते.

### ५) पुनर्वसनाची समस्या :

वस्ती असलेल्या ठिकाणी खनिजाचे साठे असतील तर खनिजाचे उत्खनन करण्यापूर्वी वस्तीचे स्थानांतरण करावे लागते. मात्र हे करताना लोकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

### ६) परिसंस्थेत अस्थैर्य :

खाणकामामुळे क्षेत्रातील परिसंस्थेत अस्थैर्य निर्माण होते. खाणकामाच्या प्रचंड आवाजाचा विपरीत परिणाम प्राणी जीवनावर होतो. भूपृष्ठावर खड्डे पडणे, विषारी पदार्थ हवेत मिसळणे यामुळे परिसंस्थेचे संतुलन ढासळते.

## ७.४ आर्थिक विकासाशी संबंधित पर्यावरणीय समस्या / अडचणी

देशाचा भविष्याचा विचार केला असता देशापुढे तीन प्रमुख आर्थिक समस्या आहेत. लोकसंख्या नियंत्रण, पर्यावरण रक्षणासह आर्थिक विकास, दारिद्र्य निर्मूलन इत्यादी. पृथ्वीचे तापमान सतत वाढण्याचे कारण म्हणजे मानवाचा पर्यावरणातील हस्तक्षेप आणि आर्थिक विकास होय. या दोन्हीमुळे गेल्या २०० वर्षात ०५.१% इतके तापमान वाढले आहे. हवामानातील बदल हा त्या प्रदेशातील कृषी उद्योगांचे स्थलांतर, प्राण्यांचे स्थलांतर, मानवी वस्तीला प्रतिकूल ठरु शकते. पर्यावरणाच्या ऱ्हासाचे आणि प्रदूषणाचे परिणाम गरीबांना अधिक भोगावे लागतात. अशुद्ध पाणी, रोगराई इत्यादींना त्यांना सामोरे जावे लागते. या सर्वांचे परिणाम म्हणून गरिबांच्या आरोग्यविषयक व आर्थिक समस्या, धोके यात वाढ होणार आहे. या समस्याचे विवेचन पुढीलप्रमाणे -

### १) स्वच्छ पाणी व सांडपाण्याच्या व्यवस्थेचा अभाव :

जागतिक बँकेच्या अहवालानुसार विकसनशील देशात १ अब्ज लोकांना पिण्यायोग्य पाणी मिळत नाही. तसेच १.७ अब्ज लोकांसाठी सांडपाण्याची योग्य सोय नाही. हिवताप, कॉलरा इत्यादी रोगांना बळी पडून मानवी कल्याणात घट झाल्याचे निदर्शनात आले आहे.

### २) वायु प्रदूषण :

औद्योगिकीकरणाबरोबर स्वयंचलित वाहनांचा प्रदूषणात मोठा वाटा आहे. उद्योगधंदे, घरगुती ऊर्जा, वाहने इत्यादीमुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषणात वाढ झाली. १९८० मध्ये १.३ अब्ज लोक जे उपनगरी भागात राहतात त्यांना धूळ व धूर या व्यतिरिक्त उत्सर्जनाचा त्रास सहन करावा लागला. या प्रदूषणामुळे मानवांना अनेक रोगांशी सामना करावा लागतो. उदा. श्वसनाच्या संदर्भातील विविध आजार, कर्करोग, त्वचेचे आजार, दमा, रक्तातील ऑक्सिजनची कमतरता, दृष्टी कमी होणे, डोळ्यांची जळजळ, खोकला इत्यादी. सध्या मोठ्या प्रमाणावर नायट्रोजन, सल्फर, कार्बन यासारखे घातक वायू हवेत मिसळत आहेत. त्यामुळे मानवी आरोग्य धोक्यात येत आहे.

### ३) जमिनीची सुपिकता नष्ट होणे :

कृषी व्यवसायामध्ये जमीन नैसर्गिक साधनसंपत्ती असून ती मुख्य भांडवल म्हणून ओळखले जाते. जमीनीच्या सुपीकतेवर मानव व संपुर्ण सजीवसृष्टी अवलंबून आहे. मात्र ही सुपीकता नष्ट होत आहे. अधिक उत्पादन मिळविण्याच्या हव्यासापोटी अनेक सेंद्रिय खतांचा मोठ्या प्रमाणावर वापर होऊन जमिनीची सुपीकता बहुतांशी नष्ट झालेली दिसून येते. या व्यतिरिक्त अनेक कारणे आहेत. उदा. सतत एकच पीक घेणे, खाऱ्या पाण्याचा सतत वापर, जलधारण क्षमता कमी, सेंद्रीय खतांचा वाढता वापर इत्यादी.

### ४) जंगलतोड आणि जैवविविधतेचा ऱ्हास :

विकसनशील देशातील जंगले, समुद्रकिनाऱ्यावरील वनसंपदा, अंतर्गत पाणथळ जागा इत्यादी झपाट्याने नाश पावत आहेत. यामुळे जैवविविधता वेगाने नष्ट होत आहे. त्यामुळे हवामानात बदल, किनारा प्रतिबंधात्मक कमतरता यात बदल होत आहेत.

### ५) हरितगृह वायू व तापमानात वाढ किंवा ग्लोबल वॉर्मिंग :

कार्बन डायऑक्साइड व इतर हरित वायू मुळे तापमानात वाढ होते. वातावरणाचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांनुसार तापमानात आणखी ३ अंश डिग्री सेल्सिअसने वाढ होऊन समुद्र पातळी वाढ होऊन याचे परिणाम येणाऱ्या पिढीला भोगावे लागतील.

A. २०५० सालापर्यंत पृथ्वीच्या तापमानाची वाढ ही मानवी ऐतिहासिक नोंद मध्ये सर्वात जास्त असेल.
B. पर्जन्य प्रमाणात बदल संभवेल.
C. महासागरातील बेटांचे आकार बदलणे, भूकंप व ज्वालामुखीच्या उद्रेकाची नियमित शक्यता नाकारता येणार नाही.
D. वेगवेगळ्या रोगांचा प्रसार वेगाने होईल. उदा. हिवताप, मलेरिया इ.
E. तापमान वाढीमुळे बाष्पाचे प्रमाण कमी होऊन गहू, तांदूळ, मका यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घटेल.

### ६) हवामानातील बदल :

हवामानातील बदलामुळे जलचक्रावर विपरीत परिणाम होऊन त्यामुळे पूर येणे, दुष्काळ पडणे, सागरी जल पातळीत वाढ, किनारी प्रदेश पाण्याखाली येणे, कृषी उत्पादनातील बदल व सर्वच प्रदेशात नैसर्गिक असमतोल आढळून येईल की, ज्यामुळे मनुष्य जीवन धोक्यात येईल. त्यामुळे मानवाच्या आर्थिक विकासावर त्याचा विपरीत परिणाम होईल.

### पर्यावरणीय समस्या दूर करण्यासाठी उपाययोजना :

आर्थिक वृद्धी आणि विकासाचे चांगले-वाईट परिणाम होत असतात. १९९२ च्या जागतिक विकास अहवालाने उत्पादन वाढीबरोबरच पर्यावरण रक्षणासाठी उपाययोजना आखल्या. यातील दारिद्य निर्मूलन ही महत्त्वाची उपाययोजना होती. धोरणे आणि आर्थिक कार्यक्षमता आणि पर्यावरण रक्षण महत्त्वाचे आहे. पर्यावरण रक्षणासाठी ठोस निर्णय राबविणारी सरकारी यंत्रणा व संस्था असल्या पाहिजे यातून आर्थिक विकास व पर्यावरण यात समतोल प्रस्थापित करता येईल.

munotes.in

**महत्त्वाची धोरणे / उपाययोजना :**

**१) पर्यावरण आणि विकास यात सकारात्मक संबंध निर्माण करणे :**

आधुनिक तांत्रिक प्रगती, कच्च्या मालाचे कमीत कमी विनिमय, टाकाऊ द्रव्य निर्माण करणाऱ्या धोरणांची अंमलबजावणी केली पाहिजे. हे धोरणे साध्य करण्यासाठी पुढील उपाय योजले जातात.

**अ) किंमत भेद नष्ट होणे :**

सरकारी धोरणात केरोसीन इंधनावर दुहेरी किंमत आखली जाते. यामुळे खुल्या बाजारात आणि सवलतीचा दर अशा दुहेरी किंमतीमुळे वायू प्रदूषणात वाढ होते. इंधनावरील सवलत रद्द केल्यास फक्त कार्यक्षमतेत वाढ व आर्थिक बचत होईल असे नव्हे तर स्थानिक प्रदूषणात घट होईल. त्याचा जागतिक पातळीवर इंधनामुळे निर्माण होणाऱ्या कार्बन उत्सर्जनात घट होईल.

**ब) मालमत्ता अधिकार बहाल करणे :**

लोकांना एकत्रितपणे सार्वजनिक वस्तू दिल्या जातात तेव्हा त्याचा वाजवीपेक्षा जास्त वापर होतो. उदा. जंगले, चराऊ कुरणे इत्यादी. याऊलट शेतकऱ्यांना मालकी हक्क दिल्यास आपलेपणाच्या भावनेतून जंगलांची व वन जमिनीची हानी कमी होईल आणि त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचे योग्य व्यवस्थापन होण्यास मदत होईल.

**२) मानवी वर्तन बदलासाठी लक्षवेधी धोरणे आखणे :**

पर्यावरण समस्या दूर करण्यासाठी केवळ मालकी हक्क व सवलती देऊन पर्यावरणाची हानी टाळता येणार नाही. तर साधनसामग्रीचा उपभोग घेणाऱ्याच्या वर्तनाचा परिणाम इतर समाजावर होतो हे लक्षात घेऊन धोरणे आखली पाहिजेत. म्हणून भारतामध्ये वर्तनात बदल करणारी अनेक धोरणे राबविण्यात आली ती खालीलप्रमाणे -

अ) प्रथम श्रेणी बक्षीस किंवा प्रोत्साहन यावर आधारित असते. उदा. बाजारधिष्ठित धोरण
ब) द्वितीय श्रेणी संख्यात्मक किंवा निर्बंधात्मक स्वरूपात असते. उदा. नियंत्रणात्मक धोरण

**३) पाणीप्रदूषण टाळणे :**

कारखान्यातील दूषित पाणी, घरगुती सांडपाणी, नद्यांमधील कचरा यासारख्या दूषित पाण्यापासून नदी व समुद्र यांचे रक्षण करावे.

**४) सार्वजनिक खर्चाचे पुनर्विलोकन :**

सार्वजनिक खर्चाचा पर्यावरणावर परिणाम होतो. देशातंर्गत सरकारकडून व जागतिक बँकेसारख्या विकास संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक सार्वजनिक खर्चाच्या माध्यमातून केली जातात. त्यामुळे पर्यावरण महत्त्व लक्षात न घेता हानी होते. अलीकडे बऱ्याच देशात सार्वजनिक खर्चाशी संबंधित पर्यावरणाची तपासणी होताना दिसते.

**५) अडथळे दूर करणे :**

पर्यावरण रक्षणाच्या धोरणांची परिणामकारकता वाढवण्यास राजकीय दबाव कमी करणे व कार्यक्षम संस्था स्थानिक लोकांचा सहभाग हे प्रत्यक्षात आणणे गरजेचे आहे. तेव्हा अडथळे कमी होतील.

munotes.in

**अ) राजकीय मंडळीचा राजकीय दबाव संपविणे :**

पर्यावरणाची हानी कमी करण्यास राजकीय शक्तीशाली व्यक्तींकडून अधिकार काढून घेणे गरजेचे आहे. चांगल्या धोरणांचा उपयोग कमकुवत व गरीब घटकांनाच होतो. मात्र हे लोक राजकीय दृष्ट्या कमकुवत व राजकीय प्रभावहीन असतात, तर प्रदूषणकारी राजकीय दृष्ट्या प्रभावशाली असतात.

**ब) सुधारित माहितीचे आदान-प्रदान :**

पर्यावरण समस्येचे प्रमुख कारण म्हणजे अज्ञान होय. मानवास पर्यावरण समस्येचे कारण व त्याचे परिणाम तसेच फायदे-तोटे समजल्यास भविष्यकालीन हानीचे प्रमाण कमी करता येते. त्यामुळे या संदर्भात सुधारित माहितीची देवाण-घेवाण हा एक महत्त्वाचा उपाय आहे.

**६) स्थानिय सहभाग :**

पर्यावरणीय हानी आणि आर्थिक विकास, सामाजिक फायदे याची निवड करतेवेळी स्थानीय गरजांची माहिती असणे आवश्यक आहे. स्वयंसेवी संस्थांना सांख्यिकीय माहिती नसते. त्यामुळे उपाययोजनाविषयी अभ्यास करताना त्यात स्थानिक लोकांचा सहभाग घेतल्यास निर्णय प्रक्रिया सुलभ व वेगवान होते.

## ७.५ पर्यावरण आणि चिरंतन विकास / सातत्यपूर्ण किंवा शाश्वत किंवा निरंतर विकास (ENVIRONMENT AND SUSTAINABLE DEVELOPMENT)

पर्यावरण हा सजीव सृष्टीचा आधार आहे. त्यामुळे त्याचे रक्षण करणे त्याचे संवर्धन करणे हे मानवासाठी अपरिहार्य आहे. मानव आपल्या गरजा भागविण्यास विभिन्न यंत्र तंत्राचा वापर करतो. पूर्वी लोकसंख्या कमी होती. मात्र आज वाढती लोकसंख्या, शहरीकरण, जंगलतोड, अमर्यादित साधनसंपत्तीचा वापर यामुळे नैसर्गिक साधनसंपत्ती नष्ट होत आहे, प्रदूषणाचे प्रमाण वाढते आहे. नवनवीन यंत्र तंत्राचा वापर करुन मानव पर्यावरणामध्ये हस्तक्षेप करताना दिसतो. मानवाने आपला विकास गतिमान ठेवण्यासाठी पर्यावरणात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. मानव आणि पर्यावरण यात संघर्ष सुरु झाला. ज्या प्रमाणात मानव संसाधनाचा वापर करतो त्या प्रमाणात त्यांची पुनर्निर्मिती होत नाही.

१९६० ते १९७० साली प्रथमच पर्यावरण हानीबाबत देशात जनजागृती निर्माण झाली. १९८० मध्ये त्याचा विस्तार विकनसशील देशापर्यंत पोहोचला. ओद्योगिक क्रांतीनंतर पर्यावरणाची सातत्यपूर्ण आणि चिरंतन विकास या संकल्पनेला महत्त्व येण्यास सुरुवात केली. १९८७ साली विश्व आयोग नेमण्यात आला या आयोगाचे अध्यक्ष नॉर्वेचे भूतपूर्व पंतप्रधान जी. एच. ब्रटलँड हे होते. त्यामुळे हा आयोग 'Brantland' आयोग या नावाने प्रसिद्ध आहे. आयोगाने पर्यावरण विकास म्हणजे चिरंतन विकास ही संकल्पना सर्वात प्रथम मांडली.

**व्याख्या :**

१) ब्रटलँड अहवाल (१९८७), नुसार "चिरंतन विकास म्हणजे असा विकास की, जो विकास भविष्यकाळातील पिढ्यांचा गरजा पूर्ण करण्यात कोणतीही बाधा न आणता वर्तमान काळातील पिढीच्या गरजा पूर्ण करेल."

२) रॉबर्ट अँलन यांच्यानुसार "चिरंतन विकास हा असा विकास आहे की जो मानवी गरजांचे चिरंकाल टिकणारे साधन आणि मानवी जीवनाच्या दर्जात सुधारणा साध्य करणारा विकास होय."

**चिरंतन विकासाची गरज (Need of Sustainable Development) :**

शाश्वत विकास म्हणजेच चिरंतन विकास कधीही न संपणारी प्रक्रिया म्हणून ओळखली जाते. पर्यावरणातील घटक जलद गतीने नष्ट होत आहेत. यातून शाश्वत विकासाची गरज देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झाली. म्हणून खालील घटकांच्या प्राप्तीसाठी चिरंतन विकासाची गरज महत्त्वाची आहे.

१. भविष्यात साधनसंपत्तीची उपलब्धता व्हावी.
२. जीवनमान चांगले असावे.
३. प्रदूषण कमी करणे.
४. दारिद्र्याचे निर्मूलन करणे.
५. पर्यावरणाचा समतोल साधणे.
६. वन उत्पादने प्राप्त होणे.
७. जमिनीचा ऱ्हास थांबविणे.
८. आर्थिक विषमता कमी करणे.

**चिरंतन विकास साधण्यासाठी आवश्यक घटक / मार्ग (Factors of Sustainable Development) :**

चिरंतन विकास साधताना मानवासमोर अनेक समस्या / प्रश्न निर्माण होणार आहेत. वाढती लोकसंख्या, दारिद्र्य व बेकारी, कुपोषण, आर्थिक विषमता, राजकीय अस्थिरता इत्यादी घटकांमुळे पर्यावरणात असमतोल वाढत आहे. खालील मार्गाचा अवलंब केल्यास चिरंतन विकास साध्य होईल.

**१) लोकसंख्या वाढीवर नियंत्रण :**

लोकसंख्या वाढ हे सर्व समस्यांचे एक मूलभूत कारण आहे. लोकसंख्या ज्या प्रमाणात वाढते, त्याप्रमाणे त्यांच्या गरजा वाढतात. या गरजा भागविण्यासाठी साधनसंपत्तीवर ताण पडतो. कारण लोकसंख्या वाढते, मात्र साधनसंपत्ती मध्ये वाढ होत नाही, याउलट लोकसंख्या कमी झाल्याने साधनसंपत्तीवरील ताण कमी होईल. पर्यावरणाचे रक्षण होईल, लोकसंख्या नियंत्रण, साक्षरता, कुटुंबकल्याण योजना, अंधश्रद्धा निर्मूलन, जनजागृती इत्यादी माध्यमातून लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे सोपे जाईल.

**२) वनीकरण :**

देशाच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३३% क्षेत्र वनांनी व्यापलेले असणे पर्यावरणाच्या दृष्टीने गरजेचे आहे. मानवाने कोणत्या ना कोणत्या कारणासाठी वनांची मोठ्या प्रमाणात तोड केली. उदा. पर्यटन, वाहतूक, शेती, उद्योगधंदे व वसाहती, लोहमार्ग इत्यादी. या सर्वांचा पर्यावरणावर परिणाम होऊन त्यात घट झाली असून वातावरणातील कार्बनचे प्रमाण वाढते, तापमानात वाढ होते व जमिनीची धूप यासारख्या समस्या निर्माण होऊन, पर्यावरणाचा समतोल ढासळतो.

munotes.in

**३) ऊर्जेची बचत :**

उर्जेची गरज दगडी कोळसा, खनिज तेल, नैसर्गिक वायू याद्वारे भागविली जाते. याचे साठे मर्यादित आहेत. त्यामुळे भावी पिढीसाठी ऊर्जास्त्रोतांचा वापर काळजीपूर्वक व काटकसरीने करणे गरजेचे आहे. हे साठे संपुष्टात आले तर भविष्यात ऊर्जेचा प्रश्न निर्माण होणार आहे.

**४) 'वापरा आणि टाका' संस्कृतीचा त्याग करणे :**

'वापरा आणि टाका' (Use and Throw) ही विकसित देशातील संस्कृती भारतासारख्या विकसनशील देशांना परवडणारी नाही. मात्र ही संस्कृती आज जीवनाचा एक अविभाज्य भाग बनली आहे. यामुळे पर्यावरणात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. त्यामुळे पर्यावरणाची अपरिमित हानी होते. उदा. प्लॅस्टिकचा वापर करुन तो कचरा टाकला जातो. पण प्लॅस्टिकच्यामुळे पर्यावरणाचा नाश होतो. प्लॅस्टिक नष्ट होत नसल्यामुळे अनेक समस्या निर्माण होतात.

**५) शेतीयोग्य जमिनीचे संधारण :**

आजही शेती हा प्रमुख व्यवसाय असून मानवाने प्रगती केली आहे. मात्र त्याला कृत्रिम अन्नधान्य तयार करता आले नाही. त्यामुळे अन्न निर्मितीसाठी आज ही जमिनीवर अवलंबून राहणे अनिवार्य आहे. त्यामुळे शेतीयोग्य जमिनीचे संवर्धन केलेच पाहिजे.

**६) पर्यायी ऊर्जा साधनांचा वापर :**

साधनसंपत्तीचा वापर मानवाने मोठ्या प्रमाणात केल्याने याचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे साधनसंपत्तीचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. जलविद्युत, पवन ऊर्जा, भूगर्भ ऊर्जा, सौर ऊर्जा, सागरी लाटांपासून ऊर्जा इ. पर्यायी ऊर्जा साधनांचा वापर करावा जेणेकरुन आर्थिक विकास घडवून आणणे शक्य होईल.

**७) साधनसंपत्तीचे पुनर्चक्रीकरण :**

काही संपत्ती वापरल्यानंतर फेकून दिली जाते. मात्र त्याचा पुनर्वापर करणे ही काळाची गरज आहे. उदा. लोखंड, ॲल्युमिनियम, तांबे इत्यादी यापासून तयार झालेले वस्तू नंतर टाकून दिल्या जातात मात्र त्यापासून पुन्हा नवीन वस्तू तयार करणे गरजेचे आहे. ज्यामुळे खनिजांची बचत होईल

**८) वस्तूंचा पुनर्वापर :**

काही साधनसंपत्तीच्या वापरानंतर ती विनाशापासून तयार झालेल्या पदार्थाचा आपण इतर ठिकाणी पुन्हा वापर करु शकतो. उदा. खनिज तेलापासून डांबर किंवा कारखान्यात वापरलेल्या चुनखडीपासून बांधकाम साहित्य, खडू तयार करता येईल. दगडी कोळसा जाळल्यानंतर त्यापासून तयार झालेली राख, सिमेंटचे पत्रे, विटा, विद्युत तारांचे वेस्टन इत्यादी साठी वापरता येते. म्हणून अशा साधनसंपत्तीचा पुनर्वापर करणे गरजेचे आहे.

**९) जनजागृती :**

जनजागृती हे सर्वात प्रभावी असे माध्यम आहे. साधनसंपत्तीचे मर्यादित साठे व पर्यावरणातील समस्या या मानवनिर्मिती असल्याने मानवाच्या विचार पद्धतीत बदल करणे गरजेचे

आहे. जनजागृतीच्या माध्यमातून पर्यावरणात निर्माण होणाऱ्या समस्यांच्या दुष्परिणामांची जाणीव लोकांना करुन दिली तर त्याचे मनपरिवर्तन होईल व ते स्वतःहून पर्यावरणाच्या संरक्षणासाठी व विकासासाठी हातभार लावतील, त्याकरिता जनजागृती करणे गरजेचे आहे.

## ७.६ सारांश (CONCLUSION)

१. पर्यावरण व विकास ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत.
२. आर्थिक विकास साध्य करण्यासाठी पर्यावरणाची मोठ्या प्रमाणावर हानी केली जाते.
३. जॉकी स्मिथ यांच्या मते, 'मानवाला कोणत्या ना कोणत्या तरी प्रकारे उपयोगी पडणारे पर्यावरणीय घटक म्हणजे साधनसंपत्ती होय.'
४. ब्रटलँड अहवालामध्ये दिल्याप्रमाणे, "चिरंतन विकास म्हणजे असा विकास होय की जो विकास भविष्यकाळातील पिढ्यांच्या गरजा पूर्ण करण्यात कोणत्याही बाधा न आणता वर्तमान काळातील पिढीच्या गरजा पूर्ण करेल."

## ७.७ प्रश्न (QUESTIONS)

१) वाढत्या आर्थिक क्रियांचा पर्यावरणावरील परिणाम अभ्यासा.
२) साधनसंपत्तीची व्याख्या देवून वर्गीकरण स्पष्ट करा.
३) चिरंतन विकासाची व्याख्या सांगून चिरंतन विकास साध्य करण्यासाठीचे आवश्यक घटक स्पष्ट करा.

## ७.७ संदर्भग्रंथ (REFERENCE)

१. विकास व पर्यावरणाचे अर्थशास्त्र - प्रा. सौ. अलका झिमरे (सुयश प्रकाशन)
२. वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र - डॉ. जे. एफ. पाटील (फडके प्रकाशन)
३. आर्थिक वृद्धी आणि विकास - प्रा. सोनटक्के आणि प्रा. जोशी (शेठ प्रकाशन)
४. आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र - प्रा. गंगाधर वि. कायंदे-पाटील (चैतन्य प्रकाशन, नाशिक)
५. Basu, Kaushik (1998) Analytical Development Economics, New Delhi.
६. Ray. Debraj (2004) Development Economics, New Delhi.

❖❖❖❖

munotes.in

**घटक-४**

# ८

# विकासाचे स्थूल अर्थशास्त्र - II

**घटक रचना :**

८.० उद्दिष्टे
८.१ व्यापार आणि विकास
८.२ व्यापार आणि विदेशी विनिमय
८.३ आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना व वित्तीय संस्था
८.४ आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था
८.५ आर्थिक स्थिरिकरण आणि मुलभूत समायोजन कार्यक्रम
८.६ सारांश
८.७ प्रश्न
८.८ संदर्भग्रंथ सूची

## ८.० उद्दिष्टे

१) व्यापार आणि विकास यांमधील संबंधाचा अभ्यास करणे.
२) व्यापार आणि परकीय / विदेशी विनिमयाचा अभ्यास करणे.
३) आंतरराष्ट्रीय व्यापारी संघटना व वित्तीय संस्था यांचा अभ्यास करणे.
४) आर्थिक स्तरीकरण आणि मूलभूत समायोजन कार्यक्रम याविषयी माहिती करुन घेणे.

## ८.१ व्यापार आणि आर्थिक विकास (TRADE AND ECONOMIC DEVELOPMENT)

व्यापार आणि आर्थिक विकास या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून त्या परस्परपूरक आणि परस्परावलंबी आहेत. व्यापार ही मोठ्या प्रमाणावर केलेली एक वस्तू व सेवांची देवाण-घेवाण होय. व्यक्ती, समाज, प्रदेश, देश यांच्यातील देवाण-घेवाणीचा तपशील म्हणजे व्यापार होय. त्याचे स्वरूप सापेक्ष असते. त्यात अंतर्गत व्यापार, प्रादेशिक व्यापार, आंतरराष्ट्रीय व्यापार, असा फरक केला जातो. कोणताही व्यापार हा अर्थव्यवस्थेला लाभदायक असतो. व्यापार म्हणजे आर्थिक विकासाची दिशा दर्शविणारे होकायंत्र होय.

munotes.in

**आंतरराष्ट्रीय व्यापार : विकासाचे इंजिन (International Trade as Engine of Growth) :**

१९ व्या शतकात विभिन्न देशात आर्थिक वृद्धी घडून आली, हे अभ्यासाअंती सिद्ध झाले आहे. ज्या काळात आंतरराष्ट्रीय व्यापार वेगाने वाढत होता. त्या काळात आर्थिक प्रगतीचा वेगही जास्त होता. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेमुळे जगातील अनेक देशांच्या बाजारपेठा उपलब्ध झाल्या आहेत. इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे होऊ शकली कारण त्यावेळी त्यांची लोकसंख्या फारच कमी असल्याने अंतर्गत बाजारपेठ फारशी मोठी नव्हतीच पण इंग्लंडमधील औद्योगिक वस्तूंना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी असल्याने उत्पादन करणे इंग्लंडमध्ये शक्य झाले. इंग्लंडला लागणारा कच्चा माल, अन्नधान्य आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे मिळणे शक्य झाले. याचाच अर्थ आंतरराष्ट्रीय व्यापार हा आर्थिक विकासाला मदत करीत असतो.

**आंतरराष्ट्रीय व्यापार व आर्थिक विकास (International Trade and Economic Development) :**

पुढील घटकांच्या आधारे आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक विकास कसा घडून येतो, हे स्पष्ट करता येईल.

**१) साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे प्रत्येक देश आपल्या देशातील उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्ती आणि इतर अनुकूल घटक विचारात घेऊन विशिष्ट वस्तूंच्या उत्पादनाबाबत विशेषीकरण करतो. परिणामतः उद्योगधंद्याची कार्यक्षमता वाढून श्रमविभाजन आणि मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे लाभ मिळत जाऊन कमीत कमी खर्चात उत्पादन घेता येते. प्रत्येक देश उत्पादनात विशेषीकरण करुन उत्पन्न वाढीला चालना देतो. प्रत्येक देशांना आपल्या देशातील साधनसामग्रीचा जास्त व चांगल्या पद्धतीने वापर करण्याची संधी मिळते. त्याचा परिणाम म्हणून प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासाला मदत मिळते.

**२) बाजारपेठांच्या कक्षा रुंदावणे :**

देशात उपलब्ध असलेल्या उत्पादन साधनांचा पूर्णपणे आणि कार्यक्षमतेने वापर करुन मोठ्या प्रमाणात उत्पादन करुन देशाचा आर्थिक विकास करण्यासाठी उत्पादित वस्तूंसाठी मोठी बाजारपेठ असावी लागते. देशातील अंतर्गत बाजारपेठ लहान असेल, तर उत्पादन साधनांचा वापर करणे शक्य नसते. मात्र आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे संपूर्ण जागतिक बाजारपेठ उपलब्ध होते. त्यामुळे बाजारपेठांचे विस्तारीकरण होऊन देशाच्या औद्योगिक व आर्थिक विकासाला मदत होते.

**३) परकीय गुंतवणूकीत वाढ :**

विकासासाठी भांडवलाची गरज असते. अल्पविकसित देशातील बचत कमी असते. ती सोने, स्थावर मालमत्ता इत्यादी अनुत्पादक गोष्टीत गुंतवण्याची प्रवृत्ती असते. याउलट विकसित देशात भांडवल मुबलक प्रमाणात असते आणि अशा देशांना अल्पविकसित देशात भांडवल गुंतविण्यास फायदेशीर ठरते. परदेशातून कर्जाच्या स्वरूपात भांडवल वाढ होत जाते. विदेशी गुंतवणूकीमुळे विशेषतः विकसनशील देशाच्या विविध क्षेत्राच्या विकासाला मदत होते.

munotes.in

**४) अविकसित देशातील वस्तूंच्या मागणीत वाढ :**

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे केवळ औद्योगिक बाजारपेठ मिळते असे नाही, तर अन्नधान्य व शेतीमाल मागणी वाढते. त्यामुळे अविकसित देशांच्या विकासाला उत्तेजन मिळते. अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया या शेतीप्रधान देशात जमिनीचा पुरवठा मोठ्या प्रमाणात होतो. त्या देशाची लोकसंख्या कमी असल्याने अन्नधान्य आणि इतर शेतमाल याची मागणी कमी होते. त्यामुळे १८ व्या शतकात या देशात मोठ्या प्रमाणात शेतजमीन पडून होती. त्यामुळे आर्थिक विकासाच्या मार्गात अडचण निर्माण झालेली होती. शेतीची प्रगती होऊ लागल्यावर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विकास करणे या देशांना शक्य झाले. अशा रितीने आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे या शेतीप्रधान देशांचे पूर्ण विकसित देशात रूपांतर होऊ शकेल.

**५) आर्थिक विकासाचा वेग वाढतो :**

जोपर्यंत आंतरराष्ट्रीय व्यापार वेगाने वाढत असतो. तोपर्यंत आर्थिक विकासाचा वेग देखील वाढत राहतो. याउलट आंतरराष्ट्रीय व्यापारातील वाढीचा वेग कमी झाला की, आर्थिक विकासाचा वेग कमी होतो. हे निरनिराळ्या देशाच्या आर्थिक विकासाच्या अभ्यासावरुन आढळून येते.

**६) जलद औद्योगिकीकरण :**

अल्पविकसित देशांच्या औद्योगिकीकरणाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय व्यापाराला महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. देशाच्या जलद औद्योगिकीकरणासाठी विकसित देशांतून भांडवली वस्तू, कच्चामाल, अर्ध उत्पादित वस्तू, यंत्रसामग्री, यंत्राचे सुटे भाग, पेट्रोल, इंधन, तंत्रज्ञान आयात करता येते म्हणजेच निर्यात वाढ आणि आयात यांच्या सहाय्याने आंतरराष्ट्रीय व्यापार वाढून देशाच्या औद्योगिक पर्यायाने आर्थिक विकास घडून येतो.

## ८.२ व्यापार आणि विदेशी विनिमय (TRADE AND FOREIGN EXCHANGE)

कोणत्याही देशामध्ये विदेशी विनिमय नियंत्रणाच्या संदर्भात स्वतंत्र यंत्रणा असते. कारण विनिमय नियंत्रण हे आंतरराष्ट्रीय व्यापारास पूरक असतो. व्यापार व्यवहार, भांडवल आदान-प्रदान, व्यापारी सेवा हे विनिमय नियंत्रणाच्या अंतर्गत येतात. आर्थिक विकासासाठी साधनसामग्रीची आयात करणे, विदेशी कर्जाची परतफेड करणे, विदेशी चलनाच्या खरेदी विक्रीवर नियंत्रण ठेवणे इत्यादी उद्देश विनिमय नियंत्रणाचे असतात. विनिमय नियंत्रण आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने किती महत्त्वाचे आहे, हे लक्षात येते.

आंतरराष्ट्रीय देवाण-घेवाण करण्यासाठी पैशाची विदेशी चलनात व्यक्त केलेली किंमत म्हणजे विदेशी विनिमय होय. दोन देशातील विनिमय दरास विदेशी विनिमय असे म्हणतात. १९९१ मध्ये परदेशी चलन साठा अत्यंत कमी झाल्यामुळे भारताने सोने विदेशी बँकांमध्ये गहाण ठेवले होते. ही घटना विदेशी विनिमय साठ्याची निगडित आहे. अनेक वेळा रिझर्व्ह बँकेजवळ विदेशी विनिमयाचा साठा कमी असतो, असे विधान ऐकले आहे. अशा वेळेस विनिमय हुंड्यात किंवा विदेशी कर्जरोखे असा अर्थ अपेक्षित असतो. म्हणून विदेशी विनिमय ही संकल्पना महत्त्वाची आहे.

munotes.in

**विदेशी विनिमय बाजारपेठ :**

आंतराष्ट्रीय व्यापारात निर्माण होणाऱ्या देवाण-घेवाणीच्या व्यवहारातून व्यापारतोल व व्यवहारतोलाचा अभ्यास महत्त्वाचा असतो. कोणत्याही देशाचे चलन देशांतर्गत क्षेत्रात कोणत्याही शंका न घेता स्वीकारले जाते. उदा. भारताचे चलन असलेल्या रुपयाला भारतात कोठेही स्वीकारले जाते. मात्र आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारताचा रुपया अस्वीकृत ठरतो. अशा वेळेस देवाणघेवाण व्यवहार पूर्ण करण्यासाठी विदेशी चलनाची खरेदी विक्री करावी लागते. विदेशी चलनाच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार ज्या बाजारातून पूर्ण केले जातात त्या बाजारास विदेशी विनिमय बाजार या नावाने ओळखले जाते. विदेशी चलनाच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार दलाल आणि डीलर यांच्या माध्यमातून पूर्ण केले जातात. म्हणून विदेशी विनिमय बाजारास हा एक सुसंघटित बाजार असे म्हटले जाते.

**परकीय विनिमय बाजारपेठेचे कार्ये :**

अ) विदेशी चलनाच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार पूर्ण करण्यास मदत करणे.

ब) विदेशी हुंड्याचा मागणीनुसार पुरवठा करणे.

क) विदेशी विनिमय बँकांकडून विदेशी चलनाच्या संदर्भातील अधिकारपत्र गोळा करुन गरजूंना विकणे.

ड) वस्तू आणि सेवा यांच्या कार्यशक्तीचे एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतर करणे.

इ) आंतरराष्ट्रीय स्तरावर देवाणघेवाणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी शोधनगृहासारखी व्यवस्था उपलब्ध करुन देणे.

ई) विनिमय दरातील बदलापासून आणि होणाऱ्या संभाव्य हानीपासून संरक्षण देण्याचे कार्य करणे.

**परकीय विनिमयाची साधने :**

आंतरराष्ट्रीय व्यापारातील देवाण-घेवाणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी विनिमयाचा अवलंब केला जातो. विनिमय दर हा निश्चित नसतो, तर त्यात बदल होतो. खरेदी विक्री केलेल्या वस्तूंचे देवाण-घेवाण पूर्ण करण्यासाठी विनिमयाच्या पुढील साधनांचा अवलंब केला जातो.

**१) परदेशी चलन :**

आंतरराष्ट्रीय व्यापार करण्यासाठी विदेशी चलन अत्यावश्यक आहे. विदेशी चलनाचा संग्रह विदेशी विनिमय बँका करत असतात. ग्राहकांच्या आवश्यकतेनुसार ग्राहकांना विदेशी चलन उपलब्ध करुन दिले जाते. आंतरराष्ट्रीय व्यापारातील व्यवहार पूर्ण केला जातो.

**२) सोन्याची निर्यात :**

आंतरराष्ट्रीय व्यापारातील समाविष्ट देशांमध्ये आयात-निर्यातीच्या संदर्भात मुक्त व्यापार असतो. विदेशी देणी देण्यासाठी सोन्याची निर्यात केली जाते. प्रत्यक्ष स्थिती अशी आहे की, सुवर्णाची मुक्त आयात निर्यात नसल्यामुळे हा मार्ग सरकारकडून बंद करण्यात आला आहे.

### ३) विदेशी विनिमय हुंडी :

आयात आणि निर्यात यांच्यात व्यवहार होताना काही अटी निश्चित केल्या जातात. त्यानुसार मालाची विक्री करताना निर्यातदार आयातदाराच्या नावाने विदेशी हुंडी काढतो. त्यासोबत वस्तूच्या संदर्भातील बिल ऑफ लेडींग वस्तूचा विमा उतरवून आवश्यक कागदपत्र बँकेकडे पाठवितो. विनिमय बँक विदेशी हुंडीची सूचना देऊन विदेशी हुंडीला स्वीकृती प्राप्त करतो व नंतर प्राप्त झालेले दस्तऐवज त्याच्या स्वाधीन करतो. त्यानंतर आयातदार बंदरातून प्राप्त वस्तू किंवा माल सोडवून घेतो.

### ४) बँक ड्राफ्ट :

आंतरराष्ट्रीय देवाणघेवाणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी आयातदार-निर्यातदाराच्या नावाने बँकेत ड्राफ्ट काढून व्यवहार पूर्ण करतात. त्यासाठी विदेशी चलन प्राप्त करता येते.

### ५) टेली ग्राफिक ट्रांजेक्शन किंवा ट्रान्सफर :

आंतरराष्ट्रीय व्यापारातील देवाण-घेवाणीचे व्यवहार त्वरित पूर्ण करण्यासाठी बँका विदेशातील बँकेला तार करुन सूचना देतात. तेव्हा विदेशी बँका निर्यातकास ही रक्कम देतात, त्या पद्धतीला टेलीग्राफिक ट्रान्सफर पद्धत असे म्हणतात.

### ६) मेल ट्रान्सफर :

देवघेवीचे व्यवहार करण्यासाठी आयातदार निर्यातदार देण्यात येणारी रक्कम बँक खात्यात जमा करतो आणि विदेशी बँकेला त्या संदर्भात सूचना पाठविली जाते. विदेशी व्यवहार करण्याचा हा खात्रीशीर मार्ग आहे. आयातकास विशिष्ट रक्कम किती दिवसात प्राप्त व्हावे, याबाबत हमी हवी असल्यास गॅरेंटेड मेल ट्रान्सफर चा उपयोग केला जातो.

### ७) पतपत्रे :

पत्रपत्रांना प्रत्यय पत्रे किंवा लेटर्स ऑफ क्रेडिट असे म्हणतात. विदेशी विनिमय बँक जवळ उचित रक्कमेची तार किंवा बँकेतील खात्यात रक्कम जमा केल्यास बँकांकडून पतपत्रे देण्यात येतात. पत्र दिल्यानंतर आयातक बँकेच्या विदेशी शाखांवर रकमेची हुंडी काढून ती हुंडी स्वीकारण्यात यावी अशी सूचना बँकेला देतो. त्यानुसार पत्रधारकांना विशिष्ट रक्कम प्राप्त होते.

आंतरराष्ट्रीय व्यापारातील देवाणघेवाणीचे व्यवहार पूर्ण करण्यासाठी वरील साधनांचा अवलंब केला जातो.

## ८.३ आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना व वित्तीय संस्था (INTERNATIONAL TRADE ORGANIZATION AND FINANCIAL INSTITUTIONS)

### ८.३.१ जागतिक व्यापार संघटना (World Trade Organization) :

दिनांक १ जानेवारी १९९५ रोजी जगातील १२७ देशांनी जागतिक व्यापार संघटनेचे सभासदत्व म्हणून सामंजस्य करार मान्य केला. भारत हा जागतिक व्यापार संघटनेची स्थापना करणाऱ्या देशांमधील एक देश आहे. जागतिक व्यापार संघटना ही आंतरराष्ट्रीय व्यापार नियंत्रण

करणारी, परकीय गुंतवणूक, बौद्धिक मालमत्ता अधिकार इत्यादीविषयी नियम ठरविणे व सभासद राष्ट्रांनी त्याची अंमलबजावणी करावी, यासाठी प्रयत्नशील असणारी संघटना आहे.

**जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्टे :**

१. बहुविध देशातील व्यापाराचे व्यवस्थापन करणे. त्यासंदर्भात कराराच्या शर्तीचे पालन होत आहे की नाही, यावर नियंत्रण ठेवणे.

२. जागतिक व्यापाराच्या बहुविध देशातील व्यापाराच्या शर्ती ठरविणे, या संघटनेद्वारे शक्य होते.

३. सभासद राष्ट्रांमध्ये व्यापार शर्तीबाबत मतभेद झाल्यास कराराचा अभ्यास करुन त्यातील नियमानुसार राष्ट्रांमधील भेद सोडविणे.

४. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विकासासाठी व मतभेदाविना हा व्यापार कसा वाढवता येईल, याविषयी प्रयत्न करणे.

५. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना व जागतिक बँकांच्या वित्तीय धोरणानुसार, जागतिक पातळीवर देशांमध्ये सामंजस्य व सहकार्य वाढविण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना मदत करते.

६. आंतरराष्ट्रीय व्यापारात जे घटक अडथळे आणतील, अशा घटकांना दूर करणे.

**जागतिक व्यापार संघटना विभाग :**

**१) प्रशूल्क धोरण :**

आयात-निर्यातीवर लावलेला कर म्हणजे जकात होय. जकात ही आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विकासातील अडथळा आहे. व्यापार संघटनेच्या सभासद राष्ट्रांनी सभासद देशातून होणाऱ्या आयात व निर्यात यावर कर आकारणी करु नये, हे धोरण ठरविले आहे. भारताने या धोरणाचा स्वीकार करुन २००५ पर्यंत मुक्त व्यापार धोरणाच्या दिशेने प्रयत्न केले आहेत. शेती व्यतिरिक्त इतर वस्तूंवर आयात कर भारताने खूप कमी केले आहेत. परंतु शेती, कापड इत्यादी कर आकारण्याचे अधिकार भारताने सुरक्षित ठेवले आहेत.

**२) संख्यात्मक नियंत्रणे :**

आंतरराष्ट्रीय व्यापारावर नियंत्रणासाठी कोटा, आयात, निर्यात परवाना धोरण, बहुविध कोटा धोरणे आखून देश आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या व्यवहारशेषातील त्रुटी कमी करणे, या दृष्टीने भारताने काही धोरणे आखण्याचे अधिकार आपल्याकडे सुरक्षित ठेवले आहे. भारताने १ एप्रिल, २००१ रोजी ह्या अटी शिथिल कराव्यात, असे जागतिक व्यापार संघटनेने सुचविले होते.

**३) व्यापाराशी संबंधित बौद्धिक मालमत्ता अधिकर (TRIPS) :**

१९९५ च्या कॉपीराईट कायद्यात सुधारणा करुन मार्च, १९९९ मध्ये भारत सरकारने जागतिक व्यापार संघटनेच्या धोरणानुसार कायद्यात बदल केले आहेत.

**४) व्यापाराशी संबंधित गुंतवणूक उपाय (TRIMS) :**

भारताने व्यापाराशी संबंधित परकीय गुंतवणूक धोरणात स्थानीय गुंतवणूकीची किमान मर्यादा ठरवून २२ प्रकारच्या उपभोग्य वस्तूंसाठी परकीय गुंतवणूक धोरणांचा स्वीकार केला.

स्वयंचलित वाहनातील परकीय गुंतवणूकी विषयी भारताचे काही मतभेद होते. परंतु आपणास WTO च्या शर्ती स्वीकाराव्या लागल्या.

**५) व्यापारातील सेवांविषयी सामान्य करार (GATS):**

भारताने या करारावर सह्या केल्यामुळे व्यापार सेवा क्षेत्रात ५३ सेवांविषयी भारताने मुक्त धोरण स्वीकारले. उदा. बँका, विमा, वाहतुक इत्यादी तसेच परकीय सेवांना परवानगी देण्याचे भारताला मान्य करावे लागले. मात्र सेवांची कार्यप्रणाली राष्ट्रीय संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असेल तिथे नियंत्रण ठेवण्याचा अधिकार भारताला आहे.

**६) ग्राहक मूल्यांकन सेवा :**

१९९८ मध्ये भारतात उपभोक्त्यांना दिल्या जाणाऱ्या सेवांविषयी मूल्यांकन कायदे WTO संघटनेच्या कायद्यांमध्ये सुसंगत केले.

**जागतिक व्यापार संघटनेचे फायदे :**

**१) जागतिक व्यापाराच्या आयुष्यात वाढ :**

जागतिक बँकेने केलेल्या अनुमानानुसार WTO च्या सभासदत्वामुळे भारताच्या निर्यातीत ०.५ ते १.०% एवढी वाढ होईल. दरवर्षी भारताला २.८ बिलियन अमेरिकन डॉलर्स एवढे उत्पन्न मिळेल. हा फायदा २.५ ते ७.० बिलियन अमेरिकन डॉलरपर्यंत वाढू शकतो. भारताच्या स्थूल देशांतर्गत उत्पन्नाच्या ६% एवढा फायदा दरवर्षी भारताला मिळू शकतो.

**२) वस्तूंचे पेटंट व शेती क्षेत्र :**

जागतिक व्यापार संघटनेच्या अटीमुळे भारतीय शेतीवर विपरीत परिणाम होईल. भारत सरकारला शेती क्षेत्राला दिले जाणारे अनुदान उदा. बियाणे, खते, अवजारे इत्यादी वरील अनुदान बंद करावे लागेल व त्यानुसार शेतकऱ्यांना नुकसान होईल. परकीय यंत्रणा, परकीय बियाणे आणि पेटंट परकीय कंपन्यांकडे असेल, त्याचा वापर करणे शेतकऱ्यांना बंधनकारक राहील, भारताला कमी किंमतींना निर्यात करावी लागेल, त्याचप्रमाणे शेतीजन्य वस्तू उदा. अन्नधान्य, दुध, फळे, भाजीपाला, तेल इत्यादी वस्तूंची मुक्तपणे आयात कराव्या लागतील.

**३) जकात कर निर्बंधाचा वापर :**

जागतिक व्यापार संघटनेच्या अटीमुळे सभासद देशांना जकातकर आकारता येत नसल्याने जकात व्यतिरिक्त इतर मार्गांचा अवलंब करुन सभासद राष्ट्रांनी एकमेकांच्या निर्यातीत अडथळे आणले आहेत. त्यात तांत्रिक अडथळे बाल कामगारांचा वापर, कपडे, फुले, औषधे, मांस, मासे इत्यादी वर जागतिक व्यापार संघटनेच्या निष्कर्षानुसार अनेक बंधने घातली आहेत. त्यातील अटी भारताला जाचक असल्याने भारताच्या निर्यातीवर त्याचा विपरीत परिणाम झाला आहे.

**४) अमेरिकेचे दबावतंत्र :**

विकसनशील व अल्पविकसित राष्ट्र ही अमेरिकेच्या मदतीवर अवलंबून असल्याने अमेरिकेच्या अनेक अटी त्यांना मान्य कराव्या लागतात. दोहा परिषदेनंतर जागतिक व्यापार संघटना ही उद्दिष्टांपासून अमेरिकेच्या दबावाखाली आल्याचे दिसून आले आहे.

munotes.in

### ५) बहुउद्देशीय व्यापार व जागतिक व्यापार संघटना :

अनेक देशांनी व्यापार करार या धोरणावर सुरुवातीला मोठ्या प्रमाणात टीका केल्या. संघटनेला ११८ तक्रारी, ८३ प्रकरणे, २००० मतभेद दूर करण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागले. त्यात अमेरिकेने तंटे सोडवण्यात मदत करणे तसेच अमेरिकेला मध्यस्थ म्हणून मान्यता देणे सभासदांना बंधनकारक ठरले.

### ६) जागतिक व्यापार संघटना व व्यापाराव्यतिरिक्त इतर प्रश्न :

जागतिक व्यापार संघटनेच्या स्थापनेतून विकसित राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात आपले वर्चस्व साध्य करण्याचा प्रयत्न केला. जागतिक व्यापारात व्यापाराव्यतिरिक्त विकसनशील व अविकसित राष्ट्रांच्या बालमजुरांचा उत्पादनात होणारा वापर अमेरिका, इटली, ब्रिटन या देशांनी उचलून धरला व त्यामुळे भारतासारख्या देशातील निर्यातीवर त्याचा विपरीत परिणाम झाला.

### ७) संस्थात्मक नियंत्रणे :

WTO च्या अटीनुसार भारताला आयातीवरील कर, जकात तसेच संस्थात्मक अटी उदा. कोटा, आयात परवाना यासारख्या आदींचा वापर करता येणार नसल्याने चीन, जपान, पूर्व आशियाई देश यांच्याकडून भारतात मोठ्या प्रमाणात आयात होत आहे. भारताची पेट्रोल बरोबर इतर आयात ही वाढत आहे. त्यामुळे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या व्यवहारशेषात त्रुटीची समस्या निर्माण झाली. चीनसारख्या देशांनी अवपूजनाचा मार्ग स्वीकारल्याने चीनमधील वस्तू भारतीय बाजारात स्वस्त दरात उपलब्ध होत आहेत. त्याचा भारताच्या देशांतर्गत उद्योगांच्या विकासावर विपरित परिणाम होत आहे.

### ८.३.२ उत्तर अमेरिका मुक्त व्यापार क्षेत्र (NAFTA) :

अमेरिकेचे भूतपूर्व राष्ट्रपती बिल क्लिंटन यांच्या पुढाकाराने NAFTA ची निर्मिती झाली. हा समझोता अमेरिका, कॅनडा व मेक्सिको या तीन देशांच्या एका नव्या सामर्थ्यवान क्षेत्रीय संघटनांची निर्मिती आहे. या करारामुळे संयुक्त राज्य अमेरिकेला नवजीवन प्राप्त झाले आहे. NAFTA लागू झाल्यानंतर अमेरिकेचा ६४% माल कोणताही आयात शुल्क न लावता मेक्सिकोच्या बाजारपेठेत विकला जाईल. याशिवाय भांडवल गुंतवणूकीवर सर्व नियंत्रणे क्रमशः हटविण्यात येतील. अमेरिका, कॅनडा, मेक्सिको हे देश व्यापारावर असलेली नियंत्रणे हटवून मुक्त व्यापार क्षेत्र बनवतील. NAFTA म्हणजे सर्वात मोठे मुक्त क्षेत्र मानले जाते. याची स्थापना १ जानेवारी, १९९४ मध्ये झाली. या व्यापारी क्षेत्रामध्ये ४ कोटी ९० लाख एवढी लोकसंख्या असून स्थूल देशांतर्गत उत्पादनाचे प्रमाण २४.८ मिलियन डॉलर एवढे आहे. उत्तर अमेरिकी देश एकमेकांकडून ज्या वस्तू विकत घेतात. उदा. यंत्रसामुग्री, वाहतुक सामग्री इत्यादी. या वस्तू निर्माण करणाऱ्या देशांवर संघटनेमुळे परिणाम होत असतो. अमेरिकेची संयुक्त संस्थाने सोडल्यास इतर देशांना भारताचा मोठा व्यापार झाला नाही. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा विचार करता भारत अमेरिकेत ज्या वस्तू निर्यात करतो अशा वस्तू संघटनेतील इतर देश अमेरिकेच्या संयुक्त संस्थानात निर्यात करीत नाही. त्यामुळे या संघटनेचा भारताच्या निर्यातीवर प्रतिकूल परिणाम होत नाही.

### ८.३.३ अंकटाड (United Nation Conference on Trade and Development - UNCTAD) :

जागतिक पातळीवर दुसऱ्या महायुद्धानंतरचा विचार केल्यास संयुक्त राष्ट्र संघ, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, GATT या संघटनांची स्थापना करण्यात आणि देशात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु या संघटनांच्या कार्यप्रणालीत दोष असल्याने आंतरराष्ट्रीय सहकार्य करण्यासाठी अनेक समुदाय निर्माण झाले. १९६४ च्या ठरावानुसार UNCTAD ची स्थापना आली.

**अंकटाड (UNCTAD) :**

ही संयुक्त राष्ट्रांची संलग्न आणि कायम स्वरुपाची संस्था आहे. या संस्थेची स्थापना १९६४ मध्ये करण्यामागे अनेक कारणे आहेत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व आंतरराष्ट्रीय व्यापाराचा पुरस्कार केल्याने विकसनशील आणि अविकसित देशांची कुचंबना झाली. या संस्थावर विकसित देशांचा प्रभाव असल्याची भावना विकसनशील आणि अविकसित देशांची झाली. विकसनशील देशांकडे दुर्लक्ष करण्याचे कार्य प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे या संस्थांनी केले. ही बाब युनोच्या प्रकर्षाने लक्षात आल्याने UNCTAD ची स्थापना युनोच्या General Assembly ने केली.

**UNCTAD ची महत्त्वाची उद्दिष्टे किंवा कार्ये :**

**१) विकसनशील देशाच्या उत्पादनाच्या किंमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्थिर ठेवणे:**

आंतरराष्ट्रीय व्यापारात विकसित आणि विकसनशील देशांच्या धोरणात एकवाक्यता नाही. विकसित देशातील उद्योगांना अर्थसहाय्य देऊन आंतरराष्ट्रीय पातळीवर अवपुजनाचे धोरण स्वीकारतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकसित देशांच्या वस्तू स्वस्त किंमतीत उपलब्ध होतात. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी धोरणांचा अवलंब करावा, हे उद्दिष्ट केंद्रित करण्यात आले.

**२) विकसित व विकसनशील राष्ट्रात समन्वय :**

द्वितीय महायुद्धानंतर स्थापन करण्यात आलेल्या संघटनेनंतर जागतिक स्तरावरील काही संघटनांनी प्रामुख्याने विकसित देशांच्या धोरणांना आणि भूमिकांना पाठिंबा देऊन विकसनशील व अविकसित देशांच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका पार पाडली नाही. त्यामुळे प्रत्येक देशाने वेगवेगळ्या मार्गाचा अवलंब करुन आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे निर्माण केले. या अडथळ्यांमध्ये प्रामुख्याने प्रशुल्क आणि प्रशुल्केतर अडथळ्यांचा समावेश होतो. या संघटनेच्या स्थापने मागचा विकसित व विकसनशील व अल्पविकसित राष्ट्रांच्या धोरणात समन्वय साधणे होय.

**३) विकसनशील राष्ट्रांच्या उत्पादनात सवलती :**

आंतरराष्ट्रीय व्यापारात विकसित आणि विकसनशील देशांची आर्थिक स्थितीसारखी नसते. विकसनशील देशातील उत्पादने परंपरागत स्वरूपाची असतात. विकसनशील देशाच्या उत्पादनाच्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत विकसित देशांकडून सवलती प्राप्त करुन देणे, हे महत्त्वाचे कार्य आहे. विकसित देशांतील भांडवलप्रधान तंत्र आणि विकसनशील देशातील

श्रमप्रधान तंत्राद्वारे निर्मित वस्तूंच्या दर्जाच्या गुणवत्तेची आणि किंमतीबाबत बऱ्याच समस्या असतात. त्या दूर करणे आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये विकसनशील राष्ट्रांच्या उत्पादनात सवलती देणे, हे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

**४) विकसनशील देशांचा आर्थिक विकास :**

आंतरराष्ट्रीय दृष्टीने आर्थिक विकासाचा विचार केल्यास दरडोई उत्पादनाचा विचार करुन देशाचे विकसित, विकसनशील व अविकसित देशातील नैसर्गिक संसाधनांचा विकास करण्यासाठी वेगवेगळे तंत्र उपलब्ध करुन देण्यामध्ये अंकटाडची भूमिका महत्त्वाची आहे. देशातील सामाजिक व्यवस्था व आर्थिक प्रगती भिन्न आहेत. त्यांच्यामध्ये फरक असल्याने आर्थिक विकासाच्या संदर्भात समस्या निर्माण होतात. विकसित देशाच्या आर्थिक विकासाकडे लक्ष देण्याच्या दृष्टीने अंकटाडची स्थापना करण्यात आली.

**५) व्यापार व विकाससंबंधी तत्त्व आणि धोरणे :**

आर्थिक विकास ही गुणात्मक संकल्पना असून आर्थिक वृद्धी संख्यात्मक संकल्पना आहे. आर्थिक विकास आर्थिक वृद्धी पेक्षा विस्तृत संकल्पना आहे. देशाच्या आर्थिक विकासासाठी आर्थिक नियोजनाचा अवलंब करण्यात येतो. त्यानुसार कार्य करताना भांडवलाचा प्रश्न निर्माण होतो. आंतरराष्ट्रीय व्यापार व विकाससंबंधी तत्त्व आणि धोरण यात समन्वय साधण्याचे हे कार्य अंकटाडने करावे, यासाठी त्याची स्थापना करण्यात आली.

**६) धोरणांची अंमलबजावणी :**

जागतिक स्तरावरील विकसित व विकसनशील देशांच्या संदर्भात धोरणात समन्वय साधणे गरजेचे असते. कारण भौगोलिक परिस्थिती, नैसर्गिक वातावरण, तंत्रज्ञान, उत्पादन प्रक्रिया, उत्पादन दर्जा, किंमती यामध्ये बरेच अंतर दिसून येते. त्यामुळे विकसनशील देशांना विकसित देशांचा दर्जा प्राप्त करुन देण्याच्या संदर्भात अंकटाड यांची भूमिका महत्त्वाची आहे.

**७) मध्यवर्ती केंद्र म्हणून कार्य :**

कार्याचा आणि उद्दिष्टांचा विचार करता अंकांना मध्यवर्ती केंद्र म्हणून कार्य करण्याची जबाबदारी देण्यात आली. प्रत्येक ४ वर्षांनी सभासदांची सभा घेणे आणि या सभासद राष्ट्रांच्या धोरणात समन्वय साधणे यांच्यात विकासाबाबत एकमत निर्माण करण्यासाठी मध्यवर्ती केंद्र म्हणून कार्य करते. आतापर्यंतच्या झालेल्या सभांमध्ये अनेक प्रकारचे महत्त्वपूर्ण निर्णय झाले असून विकासाच्या दृष्टीने वाटचाल सुरु झाली. मध्यवर्ती केंद्र म्हणून अंकटाडची भूमिका महत्त्वाची आहे.

## ८.४ आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था (INTERNATIONAL FINANCIAL INSTITUTION)

जागतिक दृष्टिकोनातून आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप व्यापक व्हावे आणि विविध देशांमधील नैसर्गिक साधनसामुग्रीचा विकास व्हावा, म्हणून अनेक वित्तीय संस्था द्वितीय महायुद्धानंतर स्थापन झालेल्या आहेत त्या संस्थांचे विवेचन पुढील प्रमाणे -

### ८.४.१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (International Monetary Fund) :

द्वितीय महायुद्धामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेविषयी अनेक समस्या निर्माण झाल्या. विनिमय दरात अस्थिरता निर्माण झाली. महामंदीमुळे अर्थव्यवस्था कोलमडल्या. यातून बाहेर पडण्यास व आंतरराष्ट्रीय व्यापार पूर्ववत करण्यास अमेरिकन सरकारने जुलै, १९४४ मध्ये ब्रेटनवूड येथे जगातील देशांना परिषद बोलावली. यात ४४ देश सहभागी होते. आंतरराष्ट्रीय समाशोधन संघ आणि आंतरराष्ट्रीय स्थिरता कोष या दोन प्रस्तावाचे एकत्रीकरण करुन त्याची चर्चा करुन आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, आंतरराष्ट्रीय विकास बँक स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

**आंतरराष्ट्रीय नाणेनिधीची कार्ये :**

**१) आर्थिक शोधनातील विषमता दूर करणे :**

दोन किंवा अधिक देशातील व्यापारामुळे शोधनामध्ये विषमता निर्माण होते. आयात निर्यातीपेक्षा अधिक असल्यास व्यवहारतोल प्रतिकूल असतो, अशा नाणेनिधीच्या माध्यमातून ही प्रतिकूलता कमी करण्याचा प्रयत्न होतो. यासाठी नाणेनिधी सदस्यांना विदेशी चलनाचा पुरवठा करते. यामुळे प्रतिकुलता दूर करुन संतुलन साधण्याचा उद्देश्य साध्य होण्यास मदत होते.

**२) सदस्य राष्ट्रांना संकटात मदत :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे महत्त्वाचे कार्य आहे. सभासद राष्ट्रांवर नैसर्गिक आपत्ती आल्यास किंवा या देशांचा व्यवहारातील प्रतिकूल झाल्यास मदत करण्याचे कार्य नाणेनिधी करते.

**३) विनिमय दरात स्थिरता स्थापित करणे :**

आंतरराष्ट्रीय नाणे निधीला आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी असेही म्हणतात. देशाच्या आर्थिक व्यवहारात स्थिरता व्हावी म्हणून देशांच्या विनिमय दरात स्थायित्व निर्माण होणे गरजेचे आहे. एका देशाचे चलन दुसऱ्या देशाच्या चलनात परिवर्तन करणे ज्यामुळे स्थायित्व येईल, हा व्यवस्था नियमित ठेवण्यास निधीचा उद्देश आहे. याने भिन्न देशातील विनिमय दरात स्थायित्व आणि स्थिरता निर्माण होण्यास मदत होते.

**४) बहुपक्षीय शोधन व व्यापार पद्धतीची स्थापना करणे :**

दोनपेक्षा अधिक देशात चालणाऱ्या व्यापारास आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणतात. परंतु या देशांचा जेव्हा एकमेकांशी व्यापार चालतो, तेव्हा त्यास बहुपक्षीय व्यापार म्हणतात. याचे दायित्व संशोधन करण्यासाठी आणि सभासद राष्ट्रात व्यापार पद्धतीची स्थापना करण्याच्या दृष्टीने कार्य करण्याकडे नाणेनिधीचा कल हा आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा उद्देश द्विपक्षीय कार्याच्या जागी बहुपक्षीय शोधन व व्यापार पद्धतीच्या स्थापनेस सहकार्य करणे आहे.

**५) विनिमय नियंत्रण दूर करण्यास सहकार्य :**

आंतरराष्ट्रीय नाणे निधी ही बहुशोधनाची व्यवस्था स्थापित करते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावरील विनिमय नियंत्रण दूर होण्यास मदत मिळते. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ करत असताना आंतरराष्ट्रीय नाणे निधी महत्त्वाची भूमिका पार पाडते. निधीचा हा उद्देश यशस्वी करण्यासाठी आणि निधी कडून सभासदांना दुसऱ्या राष्ट्राचे चलन उधार दिले जाते. परंतु चलन उधार देण्यात काही प्रश्न निर्माण होत असल्यास संबंधित देशाचे चलन विकण्याचे कार्य नाणेनिधीकडून केले जात असल्याने आंतरराष्ट्रीय व्यापारात अडथळे निर्माण होत नाही.

munotes.in

### ६) आंतरराष्ट्रीय व्यापार व राष्ट्राच्या संतुलित विकासात मदत :

देशात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विकासाला चालना देण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कार्य महत्त्वाचे आहे. त्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास व्हावा, या उद्देशातून असंतुलित व अविकसित भागाच्या विकासासाठी नाणेनिधीकडून भरीव आर्थिक मदत करण्यात येते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा उद्देश आंतरराष्ट्रीय व्यापार व राष्ट्रांचा संतुलित आर्थिक विकास घडवून आणणे आहे. सदस्य राष्ट्रात रोजगार व उत्पन्नाची पातळी समान ठेवण्यासाठी प्रयत्न नाणेनिधी कडून केला जातो. विनिमय दरात सातत्याने बहुपक्षीय व्यापार पद्धती अमलात आणणे, आर्थिक संकटात सापडलेल्या देशास मदत करणे इत्यादी कार्य व भूमिका ही आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कडून पार पाडली जातात.

## ८.४.२ जागतिक बँक (World Bank) :

द्वितीय महायुद्धाचे आर्थिक, सामाजिक व राजकीय परिणाम देशांवर झालेले दिसून येतात. द्वितीय महायुद्धाची आर्थिक झळ बहुतांश देशांना बसली. अनेक देशांच्या अर्थव्यवस्था या जागतिक महायुद्धामुळे डबघाईला आल्या. या देशांच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यासाठी व द्वितीय महायुद्धामुळे देशाच्या विकासावर झालेल्या नकारात्मक प्रभावापासून देशांना मुक्त करण्यासाठी युनोने पुढाकार घेतला. पुढे आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषद ब्रेटनवूड येथे १९४४ मध्ये बोलविली. या परिषदेने घेतलेल्या निर्णयानुसार जागतिक बँकेची स्थापना करण्यात आली. या आंतरराष्ट्रीय संस्थेचे कार्य २५ जून, १९४६ पासून सुरु झाले. जागतिक बँक ही आंतरराष्ट्रीय स्तरावर अतिमहत्त्वाची बँक आहे. १९४४ मध्ये जागतिक बँकेची कल्पना आंतरराष्ट्रीय पुनर्बांधणी व विकास बँक या नावाने झाली. भारत हा या बँकेचा संस्थात्मक सभासद देश आहे.

आंतरराष्ट्रीय पुनर्रचना विकास बँक (IBRD), आंतरराष्ट्रीय वित्तपुरवठा महामंडळ (IFC), आंतरराष्ट्रीय विकास संस्था (IDA), बहुकक्ष गुंतवणूक हमी संस्था (MIGA), आंतरराष्ट्रीय गुंतवणूक विवाद निवारण केंद्र (ICSID) इत्यादी संस्थांचा समावेश जागतिक बँकेत होतो.

### जागतिक बँकेची उद्दिष्टे :

### १) सभासद राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेचे पुनर्वसन :

द्वितीय महायुद्धामुळे अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांना बसलेली झळ आणि अर्थव्यवस्थेची बिकट अवस्थेतून मुक्तता करण्यासाठी महायुद्धानंतर जागतिक बँकेची स्थापना करण्यात आली. विविध देशातील गुंतवणूक साधनाच्या साहाय्याने देशाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करण्यासाठी अर्थव्यवस्थेच्या पुनर्रचनेच्या दृष्टीने जागतिक बँकेच्या नावात ‘Re-construction’ हा शब्द आहे. सभासद देशात मोठ्या प्रमाणातील गुंतवणूक उत्पादन प्रकल्पामध्ये करुन अर्थव्यवस्थेची घडी नीट बसविणे, यावर भर देण्यात आला आहे. देशाच्या उत्पादनात वाढ होईल आणि अर्थव्यवस्थेचा विकास होईल, म्हणून बँकेच्या नावात ‘Development’ हा शब्द आहे.

### २) खाजगी भांडवल गुंतवणूक प्रोत्साहन :

आंतरराष्ट्रीय व्यापारात सभासद देशाच्या अर्थव्यवस्थेचे पुनर्रचना करताना सभासद देशांच्या अर्थव्यवस्थेमध्ये खाजगी भांडवली गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन देण्यावर जागतिक बँकेने प्रोत्साहन दिले. विविध देशात या गुंतवणूकीसाठी हमी देण्याची जबाबदारी म्हणजे स्वहमीची

जबाबदारी जागतिक बँकेने स्वीकारली. खाजगी भांडवल गुंतवणूकीस प्रेरणा देऊन सभासद देशांच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना व आर्थिक विकास घडवून आणणे हा त्यामागील उद्देश होता.

### ३) विविध प्रकल्पासाठी कर्जपुरवठ्यास हमी :

जागतिक बँकेची स्थापना ही मुळात द्वितीय महायुद्धाच्या आर्थिक प्रभावामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेची दुर्दशा सुधारण्यासाठी झाली होती. त्यामुळे बँकेच्या सभासद देशातील विविध प्रकल्पांना आंतरराष्ट्रीय व्यक्ती, वित्तसंस्था, कर्जदाते यांनी केलेल्या गुंतवणूकीची हमी देणे हा उद्देश होता. विविध देश आणि त्यांच्या देशातील कर्जपुरवठ्याची परतफेड न केल्यास ती रक्कम जागतिक बँकेने परत करायची असा अर्थ आणि उद्देश त्यामागील होते. देशाच्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करताना अनेक देशांनी आर्थिक नियोजनाच्या मार्गाचा अवलंब केला. नैसर्गिक साधनांच्या विकासासाठी कर्जपुरवठा झाला, तर त्या प्रकल्पासाठी कर्जपुरवठ्याची हमी जागतिक बँकेने घेतल्यामुळे कर्जाच्या परतफेडीची हमी प्राप्त होण्यास मदत झाली आहे.

### ४) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा संतुलित विकास :

दोन किंवा त्यापेक्षा अधिक देशातील व्यापार होऊन आंतरराष्ट्रीय व्यापारातील समाविष्ट देशांमध्ये विकसित, विकसनशील देशांचा समावेश होतो. उत्पादित वस्तूंच्या आयात निर्यातीच्या माध्यमातून व्यापार होतांना विकसनशील देशांसाठी व्यापारतोल प्रतिकूल आणि विकसित देशांना अनुकूल राहतो. त्यामुळे विकसनशील देशांना आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा संतुलित विकास साधण्यासाठी जागतिक बँकेने सहकार्य करण्यावर भर दिला आहे.

### ५) व्यवहारतोल समतोल प्रस्थापित करणे :

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये एका दिशेने केलेली निर्यातही दुसऱ्या देशाकडून केलेल्या आयातीपेक्षा अधिक असेल तर व्यापारतोल हा पहिल्या देशासाठी अनुकूल आणि दुसऱ्या देशासाठी प्रतिकूल असतो. व्यापारतोलात फक्त दृश्य वस्तूंची आयात निर्यातीचा विचार होतो. मात्र व्यवहारशेषात दृश्य आणि अदृश्य अशा दोन्ही वस्तूंचा समावेश होतो. व्यवहारतोल समतोल प्रस्थापित करण्यासाठी जागतिक बँक मदत करते. जागतिक बँकेचे उद्दिष्ट म्हणून व्यवहारतोलाचा विचार केला जातो.

### ६) उत्पादक मालमत्तेची निर्मिती :

महायुद्धाच्या आर्थिक परिणामातून स्थापन झालेल्या जागतिक बँकेने सभासद देशांच्या कोलमडलेल्या अर्थव्यवस्थेची घडी नीट बसविण्यासाठी उत्पादक मालमत्तेच्या निर्मितीवर भर देण्याचे उद्दिष्ट स्वीकारले. सभासद देशांमध्ये उत्पादन प्रकल्प सुरु करणे, उत्पादक प्रकल्पाची हमी घेणे आणि अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करत असताना उत्पादक मालमत्तेच्या निर्मितीवर भर देणे, जागतिक बँकेच्या निधी आणि कर्जाच्या रकमेतून सभासद देशांच्या उत्पादनात वाढ कशी होईल, दिलेल्या निधीचा उपयोग उत्पादक कार्यासाठी कसा होईल आणि उत्पादक मालमत्तेची निर्मिती कशी होईल यावर भर देण्याचे लक्ष केंद्रित करण्यात आले. त्यामुळे उत्पादक मालमत्ता, उत्पादन विक्री आणि उत्पन्न कर्जाची परतफेड करुन उत्पन्न वाढ असा परस्पर संबंध प्रस्थापित होतो.

munotes.in

### ७) सभासद देशातील उत्पादकता आणि राहणीमान दर्जा उंचावणे :

जागतिक बँकेच्या उद्दिष्टांचा विचार करताना सभासद देशातील उत्पादकता आणि पर्यायाने राहणीमान उंचावण्याचे उद्दिष्ट यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. देशांमध्ये मोठ्या प्रमाणात असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा उत्पादनासाठी उपयोग करावा आणि प्रकल्पासाठी जागतिक बँकेने मदत करावी तसेच प्रकल्पामधील गुंतवणूकीची प्रति हमी घेण्याचा संदर्भात सकारात्मक भूमिका स्विकारली. या नैसर्गिक साधन संपत्तीचा विकास आणि उत्पादनातील राहणीमानाचा दर्जा उंचावण्याचे लक्ष केंद्रित केले.

### जागतिक बँकेची कार्ये :

१. सभासद देशांना स्वतः जवळील निधी, उधार भांडवल काढून किंवा हमी स्वीकारुन कर्ज देण्याचे मुख्य कार्य जागतिक बँक करते.
२. जागतिक बँकेकडून क्षेत्रीय विकासाची गरज विचारात घेऊन कर्ज देण्याचे तत्त्व स्वीकारले असल्यामुळे आतापर्यंत लॅटिन अमेरिका देशांना मोठ्या प्रमाणात जागतिक बँकेने मदत केली आहे.
३. उद्देशानुसार कर्जाचे वितरण करणे.
४. विदेशी विनिमयाच्या संकट अवस्थेत तातडीची मदत सभासद देशांना करणे.
५. जागतिक बँकेने कृषी, ग्रामीण ऊर्जा आणि औद्योगिक विकास, वाहतूक आणि दळणवळण या क्षेत्रासाठी ६५% कर्ज मंजूर केली जातात.
६. विकास आणि सहाय्यक संघटनांची स्थापना करणे.
७. तांत्रिक क्षेत्रात मार्गदर्शन करणे.
८. आंतरराष्ट्रीय वाद विवाद सोडवण्यास मदत करणे.

### ८.४.३ आशियाई विकास बँक (Asian Development Bank) :

आशियाई विकास बँक ही आंतरराष्ट्रीय आर्थिक संस्था असून आशिया खंडातील देशांच्या आर्थिक विकासासाठी कर्ज उपलब्ध करुन देणे, त्या देशासाठी गुंतवणूक वाढ करणे, आवश्यकतेनुसार तांत्रिक सल्ले देणे आणि सहकार्याची भावना निर्माण करण्याच्या उद्देशाने युनोने आशियाई आणि अतिपूर्वेकडील देशांसाठी असलेल्या आर्थिक समितीने आशियाई विकास बँक स्थापन करण्याची संकल्पना मांडली. या समितीला (United Nations Economic Commission for Asia and the Far East - ECAFE) असे म्हणतात. ४ डिसेंबर, १९६५ रोजी या बँकेची घटना स्वीकृत करण्यात आली. आशिया खंडातील इतर देशांना या बँकेच्या स्थापनेत सहभागी होता यावे, म्हणून ३१ जानेवारी, १९६६ मध्ये या बँकेने आपले कार्य अधिकृतरित्या सुरु केले.

या बँकेची दोन प्रमुख उद्दिष्टे असून बँकेचे मुख्य कार्यालय येथील मनिला येथे आहे. बँकेच्या एकूण भांडवलापैकी ६०% पेक्षा अधिक भांडवल आशियायी देशांनी पुरविले आहे.

### आशियाई विकास बँकेची उद्दिष्टे :

१. आशियातील देशांना आर्थिक वृद्धीचा दर योग्य त्या प्रमाणात ठेवण्यासाठी सहकार्य करणे.

२. देशा-देशातील श्रीमंत आणि गरीब यातील अंतर कमी करणे. तसेच लहान आणि कमी विकसित देशांच्या विकासाकडे विशेष लक्ष देणे.

३. या भागातील विकसनशील राष्ट्रांना तांत्रिक साहाय्य देऊन विकास योजना आणि त्यातील कार्यक्रमाची आखणी करुन त्याकरिता वित्तपुरवठा आणि त्यांची अंमलबजावणी करणे.

४. या विभागातील अंतर्गत तसेच विदेशी व्यापाराचा विस्तार व्हावा म्हणून सभासद देशांच्या विनंतीला मान देऊन, त्यांच्या विकास कार्यात व धोरणात योजनाबद्ध समन्वय साधणे.

**आशियाई विकास बँकेची कार्ये :**

१. तांत्रिक वस्तू उत्पादन, शेती, ऊर्जा किंवा पायाभूत सोयींचा विकास करण्यासाठी ही बँक वित्त पुरवठा करते.

२. खाजगी किंवा सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्पांना वित्तीय सहाय्य करणे वित्तीय सहाय्य याचे स्वरूप हे कर्ज किंवा हमी देणे या स्वरूपाचे असते.

३. प्रादेशिक अथवा उपप्रादेशिक प्रकल्पांच्या विकासात सहभागी होणे. या प्रकल्प विकासाकडे ही बँक विशेष लक्ष पुरविते.

४. तांत्रिक सल्ला उपलब्ध करुन देणे. यामुळे अविकसित भागात आर्थिक विकास घडून येण्यास मदत होते.

## ८.५ आर्थिक स्थैर्यकरण आणि मूलभूत समायोजन कार्यक्रम (STABILISATION AND STRUCTURAL ADJUSTMENT PROGRAMME)

समग्रलक्षी आर्थिक व्यवस्थापनात आर्थिक स्थैर्यकरण आणि मुलभूत समायोजन कार्यक्रमाचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बँक अशा प्रकल्पांच्याद्वारे आर्थिक बाबींवर नियंत्रण ठेवतात. त्यांच्या सदस्य देशांच्या अर्थव्यवस्था बळकट व विस्तारित करण्याकडे लक्ष केंद्रित करतात. आर्थिक स्थैर्यकरण किंवा स्थिरिकरण यात देशाच्या व्यवहारशेषातील अल्पकालीन असंतुलन कमी करण्यावर भर दिला जातो. तर मुलभूत समायोजन कार्यक्रमाद्वारे अर्थव्यवस्थेची दीर्घकाळात पुनर्रचना करणे आणि आर्थिक वाढ सातत्यपूर्ण राखणे इत्यादी कामे केली जातात. या कार्यक्रमात चलनाचे अवमूल्यन सार्वजनिक खर्चात कपात, सवलती बंद करणे, सार्वजनिक सेवांमध्ये कपात, परकीय गुंतवणूकीला देशी अर्थव्यवस्था खुली करणे, निर्यातप्रदान उद्योगांना प्रोत्साहन देणे इत्यादी सर्व गोष्टींचा समावेश होतो.

सर्वसाधारणपणे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी ही आर्थिक स्थितीशी संबंधित असते. तर जागतिक बँक दीर्घकालीन मूलभूत समायोजनाची संबंधित असते. १९७० च्या काळात विकसनशील देशात झालेल्या आर्थिक अडथळ्यामुळे मुलभूत समायोजन करण्यासाठी दोन संस्थांची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्याकडून अटींवर आधारित कर्ज देणाऱ्या देशांना प्रथम कडक आर्थिक उपाय योजावे लागतात.

**आर्थिक स्थैर्यकरण (Economic Stabilisation) :**

आर्थिक स्थैर्यकरणाचे धोरण म्हणजे निर्धारित विकास दरापासून ढासळलेली अर्थव्यवस्था पुन्हा योग्य मार्गावर आणण्यासाठी समग्र पातळीवर असंतुलन दूर करण्यासाठी केलेली उपाययोजना होय. अर्थव्यवस्थेच्या व्यवहारशेषाच्या असंतुलनातून निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यासाठी आर्थिक स्तरीकरण करण्याची गरज भासते. वाढती महागाई, भांडवल देशाबाहेर जाणे आणि परकीय कर्जावरील व्याज, परतफेड इत्यादी बाबींमुळे व्यवहारशेषात मोठ्या प्रमाणात असंतुलन निर्माण होते. त्यामुळे आर्थिक स्थिरीकरण करण्याची गरज निर्माण होते.

समग्र अर्थव्यवस्थेचा देशीविदेशी पातळीवरील धक्यामुळे स्तरीकरण करण्याची गरज निर्माण होते. पारंपरिक दृष्टिकोनातून व्यापार, शेती, कर्ज, व्याजदर, अन्नाची कमतरता इत्यादींमुळे व्यवहारशेषात असंतुलन निर्माण होते. तर आधुनिक काळात अतिवेगात वाढणारी महागाई, आर्थिक घसरण, बेजबाबदार धोरणे, नैसर्गिक आपत्ती इत्यादीमुळे अर्थव्यवस्थेला समग्र पातळीवर धक्के बसतात.

**आर्थिक स्थैर्यकरण धोरणाची उद्दिष्टे :**

१. व्यवहार शेषाच्या चालू खात्यातील शिल्लक वाढविणे आणि अनुकूल व्यवहारशेषाकडे वाटचाल करणे.
२. सातत्यपूर्ण आर्थिक वाढीचा दर कायम ठेवणे म्हणजे दीर्घकालीन आर्थिक वृद्धी दर समाधानकारक राखणे.
३. स्थिर किंमत पातळीला महागाईचा दर कमी करणे.
४. उच्च रोजगार पातळी

**आर्थिक स्थैर्यकरण्याबाबत आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या दृष्टिकोनाची वैशिष्ट्ये -**

**१) संख्यात्मक वैशिष्ट्ये :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आर्थिक स्थैर्यकरणाबाबतच्या दृष्टिकोनात संख्यात्मक वैशिष्ट्ये आवश्यक मानले जाते.

अ) विकास कार्यक्रमात अंतर्गत धोरणांमध्ये मुख्य समग्रलक्षी आर्थिक परिणामांबाबत अंदाज लक्षात घेतले जातात. उदा. राष्ट्रीय उत्पादन, किंमत पातळी, चालू खात्यातील शिल्लक इत्यादी.
ब) देशाची व्यवहारशेषाची देणी देण्यासाठी खात्रीशीर बाह्य कर्ज निधीची उपलब्धता आहे की नाही याकडे लक्ष दिले जाते.

**२) कामगिरी मूल्यमापनाच्या अटी :**

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कार्यक्रमात कामगिरीचे मूल्यमापन करण्यासाठी महत्त्वाच्या आर्थिक परिणामाची संख्यात्मक माहितीही लक्षात घेतली जाते. यामध्ये राजकोषीय त्रुटींवर मर्यादा, मध्यवर्ती बँकेचे निव्वळ देशी पतपुरवठा व निव्वळ आंतरराष्ट्रीय राखीव निधी इत्यादींचा समावेश होतो. आर्थिक नियोजन कार्यक्रम ही पद्धत खालील बाबी लक्षात घेऊन विकसित करण्यात आलेली आहे.

munotes.in

अ) अर्थव्यवस्था मुख्य संस्थात्मक आणि मुलभूत विकासात्मक बदल ज्यांच्यासाठी नाणेनिधीकडे मदत मागितलेली आहे.
ब) आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेत झालेले उल्लेखनीय बदल
क) आंतरराष्ट्रीय बाबी आणि समग्रलक्षी अर्थव्यवस्थेच्या अभ्यासातील प्रगती.

**३) प्रक्रिया :**

आर्थिक स्थैर्यकरणबाबतचा नाणेनिधीचा दृष्टिकोन आणि ती कशाप्रकारे कार्य करते, हे आंतरराष्ट्रीय नाणे निधीच्या आर्थिक स्थैर्यकरण कार्यक्रमाच्या प्रक्रियेवरुन लक्षात येईल. आंतरराष्ट्रीय नाणे निधी प्रायोजित कार्यक्रम हा पहिल्यापासून साचेबंद नव्हता. तो लवचिक असल्यामुळे त्यामध्ये बदल करण्यात आलेले आहेत.

**मूलभूत समायोजन कार्यक्रम (Structural Adjustment Programmes - SAPs):**

१९८० च्या दशकापासून आंतरराष्ट्रीय नाणे निधी व जागतिक बँक यांनी जगातील अविकसित व विकसनशील देशांच्या विकासासाठी आर्थिक धोरणे राबविली. या धोरणांना किंवा विकास कार्यक्रमांचा मुलभूत समायोजन कार्यक्रम असे म्हणतात.

**व्याख्या :**

मूलभूत समायोजन म्हणजे विकसनशील देशांना मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारण्यासाठी आर्थिक सुधारणा करणे, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांनी सक्तीचे केले. या आर्थिक सुधारणा करणे हीच या संस्थाकडून कर्ज निधी मिळवण्याची पूर्व अट होती.

**उगम :**

१९७० च्या सरत्या काळात जागतिक अर्थव्यवस्थेत एकामागोमाग एक अरिष्टे उद्भवल्याने मुलभूत समायोजन कार्यक्रमाचा उगम झाला. या सर्व प्रकारच्या आर्थिक अरिष्टांमुळे उदा. संकट, कर्ज संकट, अनेकांगी आर्थिक मंदी इत्यादी विकसनशील देशांच्या नियोजनकारांना राष्ट्राच्या कल्याणासाठी आर्थिक विकास कार्यक्रमात हस्तक्षेप करणे आवश्यक बनले. १९८० च्या शतकात जागतिक बँकेने केवळ आर्थिक कर्ज देण्याऐवजी मूलभूत समायोजन कार्यक्रमाद्वारे विकसनशील देशांना व्यवहारशेषातील पुन्हा-पुन्हा आलेली तुट दूर करण्यासाठी दीर्घकालीन कर्ज द्यायला सुरुवात केली.

इ.स. सन २००२ मध्ये मूलभूत समायोजन कार्यक्रमात स्थित्यंतर झाले. गरीबी निर्मुलन धोरणे राबविण्यात आली. जागतिक बँकेने नवीन विचारसरणीच्या आधारे असे मत मांडले की, सरकारच्या पाठिंब्याच्या आधारे यशस्वी आर्थिक कार्यक्रम राबविले जातात. याशिवाय गरीबी निर्मूलन कार्यक्रमाबरोबरच जास्त व निर्मितीक्षम दृष्टिकोन जागतिक बँक व नाणेनिधी यांनी स्विकारला.

**मूलभूत समायोजन कार्यक्रमाची उद्दिष्टे :**

१) दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे मुख्य उद्दिष्ट होते की, १९३० सारखी जागतिक महामंदी येण्यास प्रतिबंध करावा. ती जागतिक महामंदी रोखतेअभावी निर्माण

munotes.in

झालेली होती. नाणेनिधीचा उद्देश काही गरीब देशांना कर्ज देऊन व प्रगत देशांनी विस्तारित आर्थिक धोरणे राबवावी असा होता. त्यामुळे भावी मंदिला प्रतिबंध करता येईल.

२) १९८० च्या दशकात मोठ्या प्रमाणात राजकोषीय आणि बाह्य स्वरूपाची असंतुलन निर्माण झाली. त्याचे कारणे घटते उत्पादन व वाढती महागाई होय. या सरकारांना वाढती महागाई, अंदाजपत्रकीय तूट आणि व्यापारी तूट यांचा सामना करावा लागत होता, त्यांनी व्याजदर वाढविले, सार्वजनिक खर्च कमी करुन आयातीवर बंधने घातली. अशा काळात नाणेनिधीचे उद्दिष्ट हे ताबडतोब आंतरराष्ट्रीय वित्तामध्ये सुधारणा घडवून संतुलन साधणे हे होते. कारण दीर्घकालीन विकासासाठी, गुंतवणूक व वृद्धी, बचतीत वाढ आणि आर्थिक कार्यक्षमता निर्माण करणे आवश्यक होते.

३) मूलभूत समायोजन कार्यक्रमाची आखणी एखाद्या देशाची परकीय गुंतवणूकीचे वातावरण सुधारणे अशा प्रकारची होती. त्यासाठी व्यापारी व गुंतवणूकीवरील निर्बंध कमी करणे, निर्यात वाढ होऊन परकीय चलन कमविणे आणि सर्व सार्वजनिक खात्यात कपात करुन सरकारची तूट कमी करणे इत्यादी उपाययोजना या कार्यक्रमात आखण्यात आल्या होत्या.

**समायोजन कार्यक्रमातील अटी / शर्ती :**

शिल्लक असलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी आवश्यक ते परकीय चलन मिळविण्याची क्षमता निर्माण करणे. ही समायोजन कार्यक्रमांतर्गत देण्यात येणाऱ्या कर्जासाठीच्या मुख्य अटी होत्या. आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमामध्ये सार्वजनिक खर्च कमी करणे, व्यापार उदारीकरण, गुंतवणूक आणि भांडवल नियंत्रण, विकेंद्रीकरण, सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण इत्यादींचा समावेश होता. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी कडून आर्थिक मदत मिळविण्यासाठी विविध प्रकारच्या अटी शर्ती विकसनशील देशांना मान्य कराव्या लागतात.

अ) परकीय गुंतवणूकीच्या मर्यादा शिथील करणे किंवा काढून टाकणे त्यामुळे देशी उद्योग किंवा बँका यांना प्रचंड परकीय संस्थासमोर संरक्षण देता येईल.

ब) आयातीवरील विविध कर्ज संस्थात्मक नियंत्रणे व इतर बंधने कमी करणे.

क) व्यापार उदारीकरणाला प्रोत्साहन देणे, आयात व निर्यात बंधने उठविणे.

ड) गुंतवणूकीचे उदारीकरण आणि परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व्याजदर वाढविणे.

इ) चलनाचे अवमूल्यन करणे यामुळे आयात खर्च वाढेल व निर्यातक्षम वस्तू स्वस्त होतील व निर्यात स्पर्धात्मक बनेल.

फ) गुंतवणूकीत स्थिरता वाढविणे त्यासाठी प्रत्यक्ष किंवा थेट परकीय गुंतवणूकदारांना देशाचा भांडवली बाजार खुला करणे.

ग) संतुलित अंदाजपत्रक तयार करणे, सार्वजनिक खर्च कमी करणे, आरोग्य, शिक्षण, गृह सुविधा व नागरी सेवा यात मोठी कपात करणे.

ल) सरकारी अनुदाने आणि किंमत नियंत्रण काढून टाकणे.

स) सरकारी कारभार सुधारणे आणि भ्रष्टाचाराला आळा घालणे.

म) सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करणे अशा उद्योगात परकीय गुंतवणूकीचा प्रवेश देणे.

य) आयोग्य, शिक्षण, कल्याणकारी योजना यावरील खर्च कमी करणे. महागाई आटोक्यात आणण्यासाठी वेतन दर कपात करणे, सर्व पैसा निर्यातीसाठी उत्पादन वाढविण्यावर खर्च करणे.

न) परकीय चलन मिळविण्यासाठी अर्थव्यवस्था पुनर्रचना करुन निर्यातप्रषाण बनविणे. परकीय चलन मिळाल्यामुळे कर्जाच्या व्याजाची परतफेड करता येईल आणि जागतिक अर्थव्यवस्थेत वरील अवलंबित्व वाढेल.

झ) देशी-विदेशी पिके घेण्याऐवजी निर्यात प्रधान व्यापारी वस्तू व पिके घेणे, त्यांच्या उत्पादनाचे विशेषीकरण करणे. उदा. रबर, कापूस, कॉफी इत्यादी.

## आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेच्या मूलभूत समायोजन कार्यक्रमाचे टिकात्मक परिक्षण (Critical Evaluation of SAPs) :

१. समायोजन कार्यक्रमात व्यवहारशेष त्रुटींचे पुनरुज्जीवन करण्यावर अधिक भर दिला जातो. खर्च संकट सोडविण्यासाठी इतर योग्य आणि समतोल दृष्टिकोनाचा विचार केलेला नाही.

२. सरकारच्या सार्वभौमत्वाला दुय्यम मानले जाते व सरकारची सामाजिक आर्थिक विकासामध्ये भूमिका मर्यादित केली जाते. मुक्त अर्थव्यवस्थेच्या नावाखाली सार्वजनिक उद्योगांना खाजगीकरण, विकेंद्रीकरण इत्यादी द्वारे सरकारचे नियंत्रण कमी केले जाते.

३. या कार्यक्रमामुळे श्रीमंत आणि गरीब यामधील दरी अधिकाधिक रुंदावत जात आहे. उत्पन्नाचे केंद्रीकरण श्रीमंतांच्या हाती जात आहे. गरीब वर्ग निर्णय प्रक्रियेतुन बाहेर फेकला जातो व त्याची नैसर्गिक साधन सामग्रीवरील मालकी देखील संपुष्टात आली आहे.

४. या कार्यक्रमामुळे लोकशाही आणि लोकशाहीची प्रक्रिया धोक्यात आलेली आहे. कर्ज घेणाऱ्या सरकारांना त्यांच्या धोरणाशी विसंगत असलेल्या समायोजन कार्यक्रमातील बाबी स्विकाराव्या लागतात. ही धोरणे लोकांच्या इच्छेविरुद्ध असतात. पर्यायाने गरीब देश कर्ज परतफेड वेळेवर करु शकत नाहीत व ते दिवाळखोर बनतात.

५. समायोजन कार्यक्रमाची आखणी आणि अंमलबजावणी यामध्ये लोकसहभाग, जबाबदारी आणि पारदर्शकता यांचा अभाव आढळतो.

६. राष्ट्रीय अन्नसुरक्षा धोरण धोक्यात येते, कारण निर्यात क्षेत्रात केंद्रीकरण झाल्यामुळे व अल्पकालीन गुंतवणूकीवर अति विसंबून राहील्यामुळे असे घडते.

७. या कार्यक्रमामुळे संसदेतील बालकांचे अधिकार, विकासाचा अधिकार आणि स्त्रियांच्या अधिकाऱ्याविरुद्ध पक्षपातीपणा इत्यादी गोष्टी घडून येतात. वरील अधिकारांवर मर्यादा येते.

८. या कार्यक्रमांमध्ये केवळ देशी आर्थिक तडजोडीवर भर देण्यात येतो. त्याच वेळेला चिरंतन विकास व स्वावलंबन आणि आर्थिक नियोजन व निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग या उद्दिष्टांना वगळले जाते. वरील उद्दिष्टे बाजूला टाकली जातात.

९. समायोजन कार्यक्रमामुळे घातलेल्या बंधनांमुळे स्त्रियांना अत्यंत अप्रमाणबद्ध त्रास सहन करावा लागत आहे. सार्वजनिक सेवांमधील कपातीमुळे स्त्रियांच्या कामाच्या तानात वाढ झाली आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्य सेवा व कुटुंबाच्या शिक्षणासाठी वाढीव खर्च करावा लागतो.

munotes.in

## ८.६ सारांश

मूलभूत समायोजन कार्यक्रमाच्या माध्यमातून समग्र पातळीवरील आर्थिक घटकांची अस्थिरता संपविण्याचा प्रयत्न केला जातो. या कार्यक्रमाची परिणामकारकता मोजण्याचे सामायिक उपाय म्हणून आर्थिक विकास दर, सार्वजनिक तुट आणि महागाईची पातळी लक्षात घेतली जाते. या कार्यक्रमाच्या यशाचे मोजमाप करणारा सामायिक निर्देशांक आर्थिक विकास दर होय. काही देशांमध्ये समायोजन कार्यक्रम राबवून विकास दर मंदावला होता, तर काही देशात प्रगती वेगाने झाली. काही टीकाकारांच्या मते, या कार्यक्रमाच्या यशाचे मोजमाप आर्थिक निर्देशकाबरोबर सामाजिक आणि सांस्कृतिक निर्देशांक सुद्धा लक्षात घेतले पाहिजेत.

## ८.७ प्रश्न (QUESTIONS)

१) विदेशी विनिमय बाजारपेठेची व्याख्या देवून परकिय विनिमय बाजारपेठेचे कार्य व परकिय विनिमयाची साधने स्पष्ट करा.
२) जागतिक व्यापार संघटनेची उद्दिष्ट्ये व फायदे स्पष्ट करा.
३) जागतिक बँकेची उद्दिष्ट्ये व कार्ये स्पष्ट करा.
४) मुलभूत समायोजन कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये व शर्ती स्पष्ट करा.

## ८.८ संदर्भग्रंथ सूची

१. प्रा. सौ. अलका झिमरे, विकास व पर्यावरणाचे अर्थशास्त्र, सुयश प्रकाशन
२. डॉ. जे. एफ. पाटील, वृद्धी व विकासाचे अर्थशास्त्र, फडके प्रकाशन
३. प्रा. सोनटक्के आणि प्रा. जोशी, आर्थिक वृद्धी आणि विकास, शेठ प्रकाशन
४. प्रा. गंगाधर वि. कायंदे-पाटील, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, चैतन्य प्रकाशन, नाशिक
५. Basu, Kaushik (1998) Analytical Development Economics, New Delhi.
६. Ray. Debraj (2004) Development Economics, New Delhi.

❖❖❖❖

munotes.in